CMYK

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा


छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ०७ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३२७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

महाराष्ट्राचा अर्थसंकल्प

# शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतची कर्जमाफी

## लाडकी बहीण योजनाही अव्याहत सुरू राहणार; ७५ हजार जागा भरणार



तभा वृत्तसेवा

मुंबई, दि. ०६ मार्च : राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत २०२६–२७ चा अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकित असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची घोषणा केली. त्याचा राज्यातील हजारो शेतकऱ्यांना लाभ होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची घोषणा केली असली तरी लाडक्या बहिणींच्या अर्थसहाय्यतेत मात्र कोणतीही वाढ केली नाही. ही योजना अशीच अव्याहत सुरू राहील, असे ते म्हणाले. फडणवीस यांनी अर्थसंकल्पात याशिवायही अनेक योजना व तरतुदींची घोषणा केली आहे.

### महिलादिनानिमित्त मुख्यमंत्र्यांची मोठी भेट

राज्यातील लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असल्याची घोषणा (दि.६ मार्च) अर्थमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना आज केली. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त या योजनेच्या निधीत भरीव तरतूद केली जाणार असल्याचेही ते म्हणाले.

लाडकी बहीण योजना महाराष्ट्र सरकारने महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी सुरू केलेली एक हत्त्वाची योजना आहे. ज्याअंतर्गत पात्र महिलांना दरमहिना १,५००/– आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेसाठी आता भरीव तरतूद करण्यात आली असून, पात्र लाडक्या बहिणींनी दरमहिना मिळणाऱ्या हप्त्यामध्ये वाढ होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे

आतापर्यंत ३७ लाख लखपती दीदी झाल्या असल्याचेही अर्थमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. तसेचआणखी २५ लाख बहिणींनी लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही ते म्हणाले.



मुख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर केला. अर्थसंकल्प सादर करण्यासाठी विधिमंडळ प्रवेशद्वारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार, अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह आ. संजय बनसोडे, आ. विक्रम काळे आदी मान्यवर छायाचित्रात दिसत आहेत.

### मराठा शौर्य स्मारक ते अख साठी स्वतंत्र विभाग; फडणवीसांच्या मुख्य घोषणा

- जिल्हा वार्षिक निधीसाठी २१ हजार ८६७ कोटी रुपयांची तरतूद
- गेल्यावर्षीच्या तुलनेत १ हजार ७०८ कोटींनी अधिक तरतूद केली आहे.
- अर्थसंकल्पात खर्चासाठी ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपयांची तरतूद
- राजकोषीय तूट ही ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात शासन यशस्वी, फडणवीसांचा दावा

### आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक

- आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक
- पानिपतमध्ये मराठा शौर्य स्मारक उभारणार
- नाशिकमध्ये रामकाल विकास पथ प्रकल्प
- नागपूरमधील रामटेक येथे रामसृष्टी, कालिदास सृष्टी उभारली जाणार

### महाराष्ट्रात १ लाख २५ हजार उद्योजक घडवणार

महिमा संस्थेची स्थापना करणार असून तरुणांना बाहेरगावी जाण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले जाईल. राज्यात ३६ नवदिशा केंद्र स्थापना केली जाणार असून महाराष्ट्र हे देशाचे स्टार्ट अप कॅपिटल ठरले आहे. महाराष्ट्रात १ लाख २५ हजार उद्योजक घडवणे व ५० हजार स्टार्ट अप तयार करण्याचे उद्दिष्ट आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या चार मोठ्या घोषणा

**महात्मा फुले द्विशताब्दी वर्ष**

- क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या जन्माला २०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. यासाठी एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली असून, भव्य कार्यक्रमांसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी वर्ष (रायगड)**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी रायगड येथे विशेष पायाभूत सुविधांचा विकास केला जाईल. त्यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी हे पाऊल उचलले आहे.

**'सामाजिक समरसता वर्ष' घोषणा**

- हे वर्ष संपूर्ण राज्यात 'सामाजिक समरसता वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून सलोखा निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातील.

**बाळासाहेब ठाकरे स्मारक आणि नव्या योजना**

- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचे काम आता पूर्णत्वाकडे आले आहे. या स्मारकाच्या माध्यमातून जनसेवेच्या आणि विकासाच्या नव्या योजना सुरू करण्यात येणार आहेत.




SIP चे फायदे

मार्केटच्या टाइमिंग पासून स्वातंत्र्य | दीर्घ कालावधीत धनसंचय करण्यासाठी उपयुक्त | शिस्तबद्ध वेल्थ क्रिएशन

बरणी पासून स्वातंत्र्य

HDFC MUTUAL FUND
BHAROSA APNO KA

**गुंतवणूकदारांसाठी प्रशिक्षण आणि जागरूकता उपक्रम**

**SIP - सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेन्ट प्लॅन** | म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्यासाठी नो युवर कस्टमर (केवायसी) च्या आवश्यकता एकदाच पूर्ण करण्यासंबंधी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी https://www.hdfcfund.com/information/key-know-how येथे भेट द्या. गुंतवणुकदारांनी फक्त नोंदणीकृत म्युच्युअल फंडांसोबत व्यवहार करावा, ज्यांचा तपशील सेबीच्या वेबसाईटवर (www.sebi.gov.in/intermediaries.html) तपासून पाहता येईल. कोणत्याही प्रकारची चौकशी, तक्रार असल्यास किंवा तक्रार निवारणासाठी गुंतवणुकदार एएमसीज आणि/किंवा इन्व्हेस्टर रिलेशन्स अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात. त्याचबरोबर, गुंतवणूकदार एएमसीजकडे थेट तक्रारी नोंदवू शकतात, एएमसीज कडून देण्यात आलेल्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नाही तर https://scores.sebi.gov.in/ वरील स्कोअर्स पोर्टलद्वारे ते तक्रार करू शकतात. स्कोअर्स पोर्टल द्वारा गुंतवणूकदारांना सेबी कडे ऑनलाईन तक्रार नोंदविण्याची आणि नंतर त्याची स्थिती तपासून पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे. जर एएमसीजकडे थेट केलेल्या अथवा स्कोअर्स पोर्टलद्वारे केलेल्या तक्रारीवर मिळालेल्या प्रतिसादाने गुंतवणूकदारांचे समाधान झाले नाही तर ते https://smartodr.in/login वरील स्मार्ट ओडीआर वर कोणतीही तक्रार नोंदवू शकतात.

अधिक माहितीसाठी एमएफडी/आरआयए यांच्याशी संपर्क साधा | एसआयपीजची माहिती करून घ्या: hdfcfund.com/sip

**म्युचुअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखमींच्या अधीन असते, योजनेशी संबंधित सर्व दस्तावेज काळजीपूर्वक वाचावेत.**

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर तालुक्यात हरंगुळ मंडळातील टाकळी (शि) येथे समाधान शिबीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लातूर तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक-१ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पहिले शिबीर हरंगुळ महसूल मंडळात शनिवार, ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता मौजे टाकळी शि. येथे आयोजित करण्यात आले आहे. या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी आढावा घेतला. सर्व संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

शेतकरी आणि नागरिकांना त्यांच्या हक्काच्या शासकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी या शिबिरात विविध १६ विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. यामध्ये महसूल व पुरवठा विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न, जात, रहिवासी आणि राष्ट्रीयत्व, प्रमाणपत्र क्रिमिलियर इत्यादी प्रमाणपत्रांचे वाटप. नवीन रेशन कार्ड वितरण, रेशन कार्ड दुरुस्ती आणि ई-केवायसी सुविधा पुरविल्या जाणार आहेत. कृषी व पशुसंवर्धन विभागामार्फत ग्री स्टॅक, फार्मर आयडी मधील त्रुटी दूर करणे, बी-बियाणे व खतांची माहिती आणि पशुधनाचे लसीकरण आदी सेवा, तर पंचायत समिती मार्फत विहीर साठी अर्ज, इत्यादी व आरोग्य विभागामार्फत नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, औषधोपचार आणि साथरोगांबाबत जनजागृती केली जाणार आहे. तसेच यावेळी पीक कर्ज वाटपाबाबत मार्गदर्शन, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची माहिती, वनसंवर्धन आणि महावितरणच्या वीज कनेक्शनबाबतच्या तक्रारींचे निवारण केले जाणार आहे.



# लातूर जिल्हा पोलीस दलात आणखी चार आधुनिक फॉरेन्सिक व्हॅन दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** महाराष्ट्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या धोरणांतर्गत लातूर जिल्हा पोलीस दलाच्या तपास यंत्रणेला बळकटी देण्यासाठी आणखी चार आधुनिक फॉरेन्सिक व्हॅन लातूर जिल्हा पोलीस दलात दाखल झाल्या आहेत. या व्हॅनमुळे गुन्ह्यांच्या तपास प्रक्रियेत वैज्ञानिक पद्धतींचा अधिक प्रभावी वापर करता येणार असून गुन्हे उघडकीस आणण्यास तसेच न्यायालयीन प्रक्रियेत सबळ पुरावे सादर करण्यास मोठी मदत होणार आहे.

यापूर्वी लातूर पोलीस दलाकडे तीन फॉरेन्सिक व्हॅन कार्यरत होत्या. त्या माध्यमातून अनेक गंभीर व गुंतागुंतीच्या गुन्ह्यांच्या घटनास्थळी तात्काळ भेट देऊन तेथील भौतिक पुरावे शास्त्रीय पद्धतीने गोळा करण्यात आले आहेत. घटनास्थळी उपलब्ध असलेले बोटांचे ठसे, रक्ताचे नमुने, शस्त्राचे अवशेष, विविध भौतिक पुरावे तसेच इतर वैज्ञानिक नमुने संकलित करून त्यांचे योग्य प्रकारे जतन व विश्लेषण करण्यात येत असल्यामुळे गुन्ह्याच्या तपासाला दिशा मिळत आहे. या पुराव्यांच्या आधारे न्यायालयात आरोपीविरुद्ध सबळ व भक्कम पुरावे सादर करण्यात येत असून अनेक प्रकरणांमध्ये आरोपींना शिक्षा होण्यास मदत मिळाली आहे.

आता नव्याने दाखल झालेल्या चार फॉरेन्सिक व्हॅनमुळे जिल्ह्यातील कोणत्याही गुन्ह्याच्या घटनास्थळी तात्काळ पोहोचून वैज्ञानिक पद्धतीने तपास कार्यवाही करण्याची क्षमता अधिक वाढणार आहे. घटनास्थळी मिळणारे सूक्ष्म पुरावे सुरक्षितरीत्या गोळा करून त्यांचे योग्य दस्तऐवजीकरण करण्याची सुविधा या व्हॅनमध्ये उपलब्ध आहे. त्यामुळे गुन्ह्याचा तपास अधिक अचूक, पारदर्शक व परिणामकारक होण्यास मदत होणार आहे.

फॉरेन्सिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे गुन्ह्यांच्या तपासात पारंपरिक पद्धतींसोबतच आधुनिक वैज्ञानिक पद्धतींचा वापर वाढत आहे. यामुळे केवळ गुन्हे उघडकीस आणणेच नव्हे तर निर्दोष व्यक्तींवर अन्याय होऊ नये यासाठीही महत्त्वाची भूमिका बजावली जाते. तसेच न्यायालयीन प्रक्रियेत वैज्ञानिक पुराव्यांना अधिक विश्र्वासार्हता असल्याने आरोपींना शिक्षा होण्याची शक्यता वाढते. महाराष्ट्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत लातूर जिल्हा पोलीस दल सातत्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत असून गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यास कटिबद्ध आहे. या नव्या फॉरेन्सिक व्हॅनमुळे जिल्ह्यातील तपास यंत्रणा अधिक



सक्षम होणार असून गुन्हे उघडकीस आणण्याची गती व अचूकता वाढणार आहे.

एकंदरीत, आधुनिक फॉरेन्सिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून गुन्हे तपास अधिक सक्षम करण्यासाठी लातूर पोलीस दलाने उचललेले हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरणार असून कोणताही गुन्हेगार कायद्याच्या कचाट्यातून सुटणार नाही, असा विश्वास पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी व्यक्त केला आहे.

## विविध वृत्त...

### सहकारमहर्षी शिवाजीराव नाडे यांच्या स्मरणार्थ विविध सामाजिक उपक्रम

**लातूर :** मुरुड येथील सहकार महर्षी स्व. शिवाजीराव नाडे यांच्या स्मरणार्थ मुरुडमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले.त्यात मुरुडच्या आठवडी बाजारात बोअरवेल्स घेऊन त्यात मोटार पंप टाकण्यात आला. बाजारात येणाऱ्या शेतकरी, व्यापारी यांच्यासाठी दोन ठिकाणी पाण्याच्या मोठ्या टाक्या बसऊन पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली. तसेच जनता विद्या मंदिर प्रशालेत इयत्ता नववीतील सर्व मुलींची रक्त तपासणी करण्यात आली. आठवीतील मुलांना उन्हाळी टोप्याचे वाटप करण्यात आले. तर पाचवीतील मुलांना पाणी बॉटल वाटप करण्यात आल्या. तसेच १०० फळरोपाचे वाटपही यावेळी विद्यार्थ्यांना करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाचे नियोजन क्षेत्र विकास समितीचे सचिव प्रवीण पाटील यांच्यामार्फत करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचीव ॲड. विजय पाटील, प्रशासकीय अधिकारी अमर मोरे, सहसचिव विवेक पांगळ, मुख्याध्यापक डी. व्ही. जाधव, पर्यवेक्षिका श्रीमती तनुजा कोष्टी यांसह शिक्षक, शिक्षिका विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमर इंगळे यांनी केले. दशरथ बर्डे यांनी सहकारमहर्षी यांच्या कार्याची माहिती दिली.

### परिमल विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश

**लातूर :** परिमल शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित परिमल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील ६९ विद्यार्थी एन.एम.एम.एस. परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. त्याबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे परिमल शिक्षण प्रसारक मंडळाचे, सचिव बी. एस. जाधव, प्राचार्य श्रीनिवास जाधव पाटील, पर्यवेक्षक शेळके, मुळे, शेलमोहेकर, विभाग प्रमुख गजरे, पालक आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्वांचे कौतुक केले. या विद्यार्थ्यांमध्ये जान्हवी भागवत अंबुरे १४४ गुण, रुद्र रमाकांत दळवे १३८ गुण, अनिता रुपचंद पाटील १२७ गुण, पार्थ सुधाकर कदम, अजित बाळासाहेब मुळे प्रत्येकी १२४ गुण, आदर्श राजेश देसाई १२२ गुण, दिव्या नामदेव कोलपुसे १२० गुण, पांडुरंग वेंकटराव देवकते, संग्राम गोविंदराव यादव, प्रणव दत्तात्रय डिगोळे प्रत्येकी ११४ गुण, श्रेयश बाळकृष्ण देशपांडे ११२ गुण, समर्थ सचिदानंद चव्हाण १११ गुण, आरुष अभिजित धनेगावे १०९ गुण, समर्थ शंकर जाधव, अदिती दयानंद वाडीकर प्रत्येकी १०८ गुण, कृष्णा बालाजी मोराळे १०२ गुण, सोहम सतीश नवटके, प्रताप दत्तात्रय सोनवणे प्रत्येकी १०१ गुण, आदित्य अभिमन्यू सूर्यवंशी, दिशा मनोज मुंगळे प्रत्येकी १०० गुण मिळवले आहेत. २८ डिसेंबर रोजी संपूर्ण राज्यभरात घेण्यात आलेल्या राष्ट्रीय दृष्ट्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठीच्या या परीक्षेत विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी असताना सुद्धा परीक्षेचे पूर्वनियोजन, अंमलबजावणी, ज्यादा ताशीका, सराव परीक्षा, इत्यादी माध्यमातून केलेल्या परिपूर्ण तयारीतून विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखून स्पर्धा परीक्षेतील लातूर पॅटर्नला साजेशी गुणवत्ता सिद्ध केली आहे.

### लातूर जिल्ह्यातील एस.टी. आगारांमध्ये प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिनाचे आयोजन

**लातूर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत प्रत्येक आगारात प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील पाच आगारांमध्ये साजरा करण्यात येणाऱ्या प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिनाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. संबंधित तारखेला सकाळी १० ते सायंकाळी २ वाजेपर्यंत प्रवासी राजा दिन आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कामगार पालक दिन साजरा होणार आहे. अहमदपूर येथे ११ मार्च, २०२६ रोजी, निलंगा येथे १८ मार्च, २०२६, लातूर येथे २५ मार्च २०२६, उदगीर येथे १ एप्रिल २०२६, औसा येथे ८ एप्रिल, २०२६ रोजी राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक हे प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिनाला उपस्थित राहतील.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

## लातूर जिल्ह्यातील नागरिकांनी व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यात मंडळनिहाय एकदिवसीय समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाचा उद्देश शेतकरी व सामान्य नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न, तक्रारी व अर्ज गतीने निकाली काढणे, डिजिटल सेवांचा विस्तार करणे आणि जनतेला एकाच दिवशी सेवा पुरवणे हा आहे. याकरिता नागरिकांनी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे अर्ज करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

या शिबिरांतर्गत प्रलंबित फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत मार्गदर्शन, अकृषक तरतुदींसंदर्भात



सल्ला, डिजिटल सातबारा सुविधा, कमी-जास्त पत्रक तयार करून गाव दप्तर अद्ययावत करणे, तुकड्याच्या नोंदणीकृत दस्तऐवजाची नोंद कब्जेदार सदरी घेणे, इतर हक्कातील नोंद कमी करून भोगवटदार सदरी घेणे, संपादीत केलेल्या खाजगी व्यक्तीचे नाव कमी करून संपादीत यंत्रणेचे नाव भोगवटदार सदरी घेणे, अकृषी सातबारा वेगळा करणे, सामाजिक अर्थसहाय्याचे अर्ज स्वीकारणे व मंजुरी आदेश वाटप करणे अशा प्रमुख सेवांचा समावेश आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी व्हॉट्सॲप चॅटबॉट (क्रमांक ९५२९०९३०२२) सुरू करण्यात आला आहे. या चॅटबॉटच्या माध्यमातून तसेच सोबत जोडलेल्या क्यूआर कोडद्वारे नागरिक आपल्या अडचणी, तक्रारी किंवा अर्ज थेट सादर करू शकतात. यामुळे शिबिरांमध्ये येण्यापूर्वीच पूर्वनोंदणी व मार्गदर्शन मिळेल, ज्यामुळे प्रक्रिया अधिक गतिमान होईल. तरी सर्व नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा आणि शिबिरांमध्ये जास्तीत जास्त सहभाग घेऊन आपल्या प्रलंबित महसूली बाबींचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

### शिबिरांचे प्राथमिक वेळापत्रक

- ७ मार्च २०२६ हरंगुळ बु. (लातूर), किनीथोट (औसा), पोहरेगाव (रेणापूर), औराद शहाजनी (निलंगा), किनगाव (अहमदपूर) इत्यादी.
- १४ मार्च २०२६ बाभळगाव (लातूर), बेलकुंड (औसा), कारेपूर (रेणापूर), हलगरा (निलंगा), नळेगाव (चाकूर) इत्यादी.
- १० एप्रिल २०२६ गातेगाव (लातूर), भादा (औसा), पानगाव (रेणापूर), शिरुर ताजबंद (अहमदपूर) इत्यादी.
- १७ एप्रिल २०२६ कासारखेडा (लातूर), उजनी (औसा), पळशी (रेणापूर), निटूर (निलंगा), आष्टा (चाकूर) इत्यादी.
- ८ मे २०२६ जिल्ह्यातील प्रमुख नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर शिबिरे (लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, देवणी, शिरुर अनंतपाळ, अहमदपूर, चाकूर, उदगीर, जळकोट)

## लातूर जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी १६ मार्च रोजी, पंचायत समित्यांच्या सभापती पदांसाठी ९ मार्च रोजी निवडणूक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ११(१) आणि ५९(१) नुसार, सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ पहिल्या बैठकीपासून सुरू होतो. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार लातूर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची पहिली बैठक २० मार्च २०२६ पूर्वी आयोजित करण्यात येणार आहे.

याअनुषंगाने लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांची निवड १६ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता होणार आहे. तसेच, लातूर जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापती पदांची निवडणूक ९ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता होणार आहे.

लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांची निवडणूक प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या यशवंतराव सभागृहामध्ये पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी लातूरच्या अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, लातूर जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापती पदांच्या निवडणुका संबंधित पंचायत समितीच्या सभागृहात घेण्यात येणार असून, संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडणूक प्रक्रियेसाठी संबंधित पीठासीन अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्यांना आवश्यक नोटिसा निर्गमित केल्या असून, सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहून प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी केले आहे.

## अटल विद्यार्थी व शिक्षक जिल्हास्तरीय प्रकल्प प्रदर्शन दयानंद कलात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, महाराष्ट्र, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड, दयानंद कला महाविद्यालय, लातूर व रोटरी क्लब, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अटल विद्यार्थी व शिक्षक जिल्हास्तरीय प्रकल्प २०२५-२६ चे प्रदर्शनाचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मारुती सलगर होते, या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री संजय पंचगल्ले (सहाय्यक शिक्षण संचालक) यांच्या हस्ते करण्यात आले.श्री संजय पंचगल्ले यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारावा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नवनिर्मिती करावी, असे आवाहन केले.

# ई-चलनच्या जाचाविरोधात वाहतूकदारांचा रणसंग्राम; आरटीओ कार्यालयाला वेढा

## प्रवेशद्वारावर चक्का जाम तर अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या; प्रशासकीय कामकाज ठप्प

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** सरकारच्या चुकीच्या ई-चलन प्रणालीने सामान्य वाहन मालकांचे कंबरडे मोडले असून, या अन्यायाविरोधात महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीने राज्यव्यापी आंदोलन छेडले आहे. लातूर जिल्ह्यातील वाहतूकदार संघटनांनी आज आक्रमक पवित्रा घेतला. प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर शेकडो वाहने उभी करून चक्का जाम करण्यात आला, तर आक्रमक आंदोलकांनी थेट प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या दालनासमोर ठिय्या मांडून जोरदार घोषणाबाजी केली. दंडाची लूट थांबवा, अन्यथा खुर्च्या खाली करा, अशा घोषणांनी आज आरटीओ परिसर दणाणून गेला होता.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकाळी १० वाजल्यापासूनच शेकडो



खासगी बस, टॅक्सी आणि टेम्पो मालकांनी परिवहन कार्यालयाबाहेर गर्दी करण्यास सुरुवात केली. पाहता पाहता कार्यालयाच्या मुख्य गेटवर गाड्यांचा खच पडला आणि आत येण्या-जाण्याचे सर्व मार्ग बंद झाले. संघटनेचे पदाधिकारी आणि संतप्त वाहतूकदार थेट परिवहन अधिकाऱ्यांच्या दालनात शिरले. दालनाबाहेरच त्यांनी ठिय्या दिला, ज्यामुळे अधिकाऱ्यांनाही आपल्या केबिनमधून बाहेर पडणे मुश्किल झाले होते.

आंदोलकांचे नेतृत्व करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते: दंडाची सक्ती वसुली: गाड्यांचे फिटनेस सर्टिफिकेट, परमिट रिन्यूअल किंवा हस्तांतरण करायचे असल्यास, जुने सर्व ई-चलन भरल्याशिवाय सॉफ्टवेअर पुढे जात नाही. यामुळे मालकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

तांत्रिक गोंधळ: अनेकदा सिग्नलवर गाडी नसताना किंवा केवळ तांत्रिक चुकीमुळे हजारो रुपयांचे दंड चुकीच्या पद्धतीने पडत आहेत. या तक्रारींकडे आरटीओ प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला. अव्वाच्या सव्वा दंड: एका लहान चुकीसाठी ५ ते १० हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जात असल्याने, गाडी चालवून मिळणाऱ्या नफ्यापेक्षा दंडाची रक्कमच जास्त होत आहे.

काळ्या फिती लावून निषेध आंदोलनादरम्यान अनेक वाहन मालकांनी आपल्या वाहनांना काळ्या फिती बांधून सरकारच्या डिजिटल लुटीचा निषेध केला. आम्ही कर भरतो, विमा भरतो, मग आम्हाला गुन्हेगारांसारखी वागणूक का? असा सवाल उपस्थित केला.

दोन ते तीन तास चाललेल्या या हायव्होल्टेज ड्राम्यानंतर आरटीओ प्रशासनाने आंदोलकांशी चर्चा केली. ई-चलन ही राज्यस्तरावरील ऑनलाईन प्रणाली आहे, त्यात स्थानिक स्तरावर बदल करणे कठीण आहे, असे स्पष्टीकरण अधिकाऱ्यांनी दिले. मात्र, आंदोलक आपल्या मागणीवर ठाम होते. जोपर्यंत चुकीचे दंड रद्द करण्याबाबत लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत कार्यालय सोडून न जाण्याचा पवित्रा त्यांनी घेतला होता.

**मागण्यांचे निवेदन सादर:**

विनाकारण पडलेले आणि तांत्रिक त्रुटी असलेले ई-चलन त्वरित रद्द करावेत. दंडाची रक्कम भरण्यासाठी हप्ते पाडून द्यावेत किंवा रकमेत सवलत द्यावी. थकीत दंड असल्यामुळे परमिट किंवा पासिंग अडवू नये.

आता चेंडू सरकारच्या आणि परिवहन विभागाच्या कोर्टात असून, हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या आंदोलनामुळे आरटीओमधील कामासाठी आलेल्या सामान्य नागरिकांचे मात्र प्रचंड हाल झाले. आंदोलनात लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशन, लातूर जिल्हा युवा मोटार मालक संघ, लोकनायक मोटार चालक मालक संघ आणि खासगी वाहन चालक मालक मोठ्या संख्येने सहभागी होते. प्रशासनाने आंदोलनाची दखल घेत तात्काळ ई-चलन प्रणाली रद्द करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा जुगलकिशोर तोष्णीवाल, संदीप पाटील, उत्तम लोंढे, खय्युम शेख, विजय केदार, विश्वास कुलकर्णी, सचिन मोटे, सुनिल देशपांडे, गोविंद दायमा, मदन केंद्रे, सोमनाथ मेदगे, इनायत सय्यद, नरेश घंटे, अमोल लोकरे यांनी दिला आहे.

# जिल्ह्याच्या पालकमंत्री बोर्डीकर यांच्या प्रयत्नातून सेलूत दोन ठिकाणी गार्डनला हिरवा कंदील

**सेलू,/प्रतिनिधी-** सेलू शहरातील पारिजात कॉलनी व समता नगर येथील मोकळ्या जागेवर संरक्षक भिंत बांधून आधुनिक गार्डन साकारण्याच्या कामाचे भूमिपूजन रविवारी (दि. १ मार्च २०२६) नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांच्या हस्ते करण्यात आले.

परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री नामदार मेघनादीदी बोर्डीकर यांच्या विशेष प्रयत्नातून उपलब्ध झालेल्या निधीतून ही दोन्ही कामे मार्गी लागली आहेत. पारिजात कॉलनी येथील ओंकारेश्वर मंदिर परिसरातील मोकळ्या जागेवर सुमारे २ कोटी रुपयांच्या निधीतून संरक्षक भिंत व आकर्षक गार्डन उभारण्यात येणार आहे. तसेच समतानगर येथील राममंदिर परिसरात १ कोटी २५ लाख रुपयांच्या निधीतून संरक्षक भिंत व 'नमो गार्डन' विकसित करण्यात येणार आहे. दोन्ही गार्डनमध्ये जॉगिंग ट्रॅक, योगासनासाठी स्वतंत्र स्टेज, वॉचमन रूम, सीसीटीव्ही कॅमेरे, सुशोभित लाईट व्यवस्था आदी सुविधांचा समावेश करण्यात येणार असून परिसरातील नागरिकांना आरोग्यदायी व सुरक्षित विरंगुळ्याचे ठिकाण उपलब्ध होणार आहे. यावेळी उपनगराध्यक्ष साईराज बोराडे, भाजप तालुकाध्यक्ष गणेश काटकर, शहराध्यक्ष अशोक शेलार, नगरसेवक मनीष कदम, सुबोध काकडे, दीपक कोल्हाळ, पिंटू ठाकूर तसेच पारिजात कॉलनी व समता नगर येथील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे दोन्ही भागांचा विकास होऊन शहराच्या सौंदर्यात भर पडणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### सेलूत 'श्री सिद्धचक्र महामंडल विधान' पूजन भक्तीमय वातावरणात संपन्न

**सेलू,/प्रतिनिधी:-** सेलू येथील श्री नेमीनाथ दिगंबर जैन मंदिरात शाश्वत अष्टानिका महापर्व निमित्त आयोजित 'श्री सिद्धचक्र महामंडल विधान' पूजन कार्यक्रम अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. हा धार्मिक सोहळा २४ फेब्रुवारी ते ४ मार्च दरम्यान पार पडला.

या कार्यक्रमाला इंदोर येथील विधानाचार्य बाल ब्रह्मचारी श्री तरुण भैयाजी यांचे पावन सान्निध्य लाभले. त्यांच्या अमृतमयी वाणीचा लाभ समाजबांधवांनी घेतला. आठ दिवस चाललेल्या या मंगल महोत्सवात त्यांनी पूजेतील प्रत्येक अर्घ्याचा सखोल अर्थ स्पष्ट करत पूजनासोबत स्वाध्यायही करून दिला, त्यामुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या धार्मिक अनुष्ठानामध्ये पूजन, प्रवचन, हवन आदी कार्यक्रम उत्साहात पार पडले. सर्व समाजबांधवांच्या सहकार्यामुळे हा सोहळा यशस्वी झाला. कार्यक्रमाला सेलू परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ग्रामीण विद्यार्थ्यांची स्वप्ने आकाशात; इस्त्रो भेटीसाठी सेलू तालुकास्तरीय परीक्षा : पंचायत समिती सेलूचा अभिनव उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** सेलू तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना विज्ञान व अवकाश संशोधनाची प्रत्यक्ष ओळख करून देण्यासाठी पंचायत समिती सेलूच्या वतीने अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या केंद्राला भेट देण्याची संधी मिळावी यासाठी विशेष शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता तालुकास्तरीय परीक्षा घेण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली.

ही परीक्षा सेलू तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या इयत्ता ७ व ८ च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणार आहे. परीक्षेचे स्वरूप बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित असणार असून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची व सामान्य ज्ञानाची चाचणी घेतली जाणार आहे. प्रश्नपत्रिकेमध्ये ५० टक्के प्रश्न गणित व बुद्धिमत्ता चाचणीवर, ४० टक्के प्रश्न सामान्यज्ञानावर तर १० टक्के प्रश्न इंग्रजी विषयावर आधारित असतील.

पंचायत समिती सेलूच्या सेस निधीतून सन २०२५-२६ साठी विद्यार्थ्यांचा इस्त्रो अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत तालुक्यातील ४५ विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. तसेच तालुक्यातील प्रत्येक केंद्रातून किमान चार विद्यार्थ्यांची निवड केली जाईल, तर उर्दू माध्यमातील एका विद्यार्थ्यासही संधी देण्यात येणार आहे.

या अभ्यास दौऱ्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि अवकाश संशोधनाची प्रत्यक्ष माहिती मिळण्यास मदत होणार असून त्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### कार-दुचाकीची धडक; दुचाकीस्वार जखमी

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील रूढी पाटी परिसरात असलेल्या गजानन जिनिंग जवळ कारने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार जखमी झाला. ही घटना बुधवारी (दि. ३) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली.

एमएच ४८ एडब्ल्यू ५८७९ क्रमांकाची कार व एमएच २२ सी २१६१ क्रमांकाची दुचाकी ही दोन्ही वाहने मानवतकडे येत होती. गजानन जिनिंग जवळ दोन्ही वाहने येताच कारने दुचाकीस पाठीमागून धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार किरण नांदुरे हे जखमी झाले. त्यांना परभणी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. अद्याप मानवत पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

### कर्जबाजारीपणातून शेतकऱ्याची आत्महत्या परभणी तालुक्यातील इंदेवाडी येथील घटना

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी तालुक्यातील इंदेवाडी येथे कर्जबाजारीपणा व सततच्या नापिकीच्या विवंचनेत एका शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी (दि. ५) सकाळी उघडकीस आली.

गोविंद उत्तमराव कच्छवे (वय ४४) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. शेताची सततची नापिकी, अतिवृष्टीमुळे झालेलं नुकसान, मुलांचे शिक्षण तसेच कॅनरा बँकेचे घेतलेले १ लाख ६० हजार रुपयांचे कर्ज मागील अनेक वर्षांपासून थकीत होते. हे कर्ज कसे फेडावे, या विवंचनेतून त्यांनी गुरुवारी सकाळी स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

घटनेची माहिती मिळताच दैठणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पुढील कार्यवाहीसाठी मृतदेह जिल्हा रुग्णालय, परभणी येथे पाठविण्यात आला. या प्रकरणी मयत शेतकऱ्याचा भाऊ कल्याणसिंह कच्छवे यांच्या खबरीवरून दैठणा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

### डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या निधनाने शिक्षण व साहित्य क्षेत्राची मोठी हानी - माजी आमदार ॲड. विजयराव गव्हाणे

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातील वावरणारा मराठवाड्यातील डॉ. जनार्दन वाघमारे नावाचा एक तारा निखळला, अशी प्रतिक्रिया शिक्षण संस्था महामंडळाचे कार्यवाह माजी आमदार ॲड. विजयराव गव्हाणे यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची लातूरची जबाबदारी माझ्यावर होती. आणि पवार साहेब मला सातत्याने सांगायचे की वाघमारेंना आपल्याला जपायचे आणि मोठे करायचे आहे. लातूर नगर परिषदेच्या निवडणुकीत त्यांना निवडून आणायचे आहे. ही जबाबदारी पक्षाकडून माझ्यावर देण्यात आली. त्यावेळेस निवडणुकीमध्ये प्रचार करत असताना जनार्दन वाघमारे यांच्याबद्दलचे जनतेतील प्रेम मला दिसुन आले. त्याच्या बद्दलचा आदर आणि प्रेम मी स्वतः अनुभवले आहे. लोकांनी त्यांना निवडुन दिले. नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कार्य करत असताना त्यांनी ग्रामीण भागातील शिक्षण सुधारणेवर भर दिला. शिक्षण विषयक सुधारण्याचे स्पष्ट विचार सरकारला न घाबरता धैर्याने काम केले. म्हणून या शिक्षण व्यवस्थेतील अडचणीच्या काळातील एक धैर्यवान लढणारा लढवय्या नेता व सध्याच्या महाराष्ट्रातील बहुजन समाजातील विघटनवादी विचार पसरत असताना मराठा आणि ओबीसी समाजातील संघर्ष होता कामा नये. बहुजन समाजाची विकृत विचाराशी लढणारी वज्रमूठ तयार व्हावी आणि त्यांच्या विचाराने एकत्रित लढणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे मत ॲड. गव्हाणे यांनी व्यक्त केले.

### जिल्ह्यामध्ये ड्रॅगन फ्रूट फळबागेचे नियोजन

**परभणी** जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात स्थित असून येथील हवामान प्रामुख्याने उष्ण व अर्ध-कोरडे आहे. सरासरी कमी ते मध्यम पर्जन्यमान, उष्ण तापमान आणि चांगला निचरा असलेली जमीन ही येथील वैशिष्ट्ये आहेत. पारंपरिक पिकांमध्ये सोयाबीन, कापूस व तूर यांचा समावेश आहे.

## सेलूत फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता : सोहळ्याची जय्यत तयारी;

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील अलंकापुरी नगरी, मयुरी पार्क परिसर, सातोना रोड येथे ११ ते १९ मार्च या कालावधीत होणाऱ्या फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळ्याची जय्यत तयारी सुरू झाली आहे. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या असून संयोजन समितीच्या वतीने व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

पारायणासाठी उभारण्यात आलेल्या भव्य मंडपात दररोज सुमारे २५ हजार वाचक ज्ञानेश्वरीचे पारायण करणार आहेत. भाविकांच्या भोजनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून भोजनासाठी उभारलेल्या मंडपात एकावेळी सुमारे तीन हजार भाविकांना प्रसादाचा लाभ घेता येणार आहे. पाणीपुरवठा व स्वच्छतेची जबाबदारी नगर परिषदेकडे देण्यात आली आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालयाकडून आरोग्य सेवा आणि पोलीस प्रशासनाकडून सुरक्षेची व्यवस्था ठेवण्यात येणार आहे.

(ऐतिहासिक भव्य ग्रंथ दिंडी)

या सोहळ्याच्या निमित्ताने बुधवारी (दि.११) हेलिकॉप्टरद्वारे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुका शहरात आणण्यात येणार आहेत. सकाळी ९ वाजता सेलूचे ग्रामदैवत केशवराज बाबासाहेब महाराज मंदिर येथून ग्रंथ दिंडीला प्रारंभ होईल. ही दिंडी क्रांती चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, नूतन महाविद्यालय, रायगड कॉर्नर मार्गे अलंकापुरी नगरी, मयुरी पार्क परिसर, सातोना रोड येथील पारायण स्थळी पोहोचेल. येथे पसायदानानंतर ग्रंथ दिंडीचा समारोप होणार आहे. या ऐतिहासिक ग्रंथ दिंडीत पालखी, लेझीम पथक, रथ, ७५० पताका खांद्यावर घेऊन चालणारे वारकरी, ७५० फेटेधारी ज्येष्ठ नागरिक, ७५० तुळशी घेऊन चालणाऱ्या महिला, ७५० कलशधारी महिला, ७५० टाळकरी, ७५० 'ज्ञानेश्वरी' नावाच्या मुली तसेच शहरातील विविध भजनी मंडळांचा सहभाग असणार आहे.

(सात दिवस कीर्तन सेवा) १२ ते १९ मार्च दरम्यान दररोज सकाळी ११ ते १ आणि रात्री ८ ते १० या वेळेत विविध कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. यात नामदेव महाराज चारठाणकर, मधुसूदन महाराज दैठणकर उपस्थित आहेत.

## सोनपेठ तालुक्यात महसूल समाधान शिबिर दिवशी मिळणार अनेक शासकीय सेवा

**सोनपेठ/प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान टप्पा क्र.१ अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागरिकांना एकाच दिवशी अनेक महसुली सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सोनपेठ तालुक्यात वेगवेगळ्या तारखांना चार टप्प्यांत विशेष महसूल शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

तालुक्यातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यासाठी तालुक्याचे ठिकाण अनेक वेळा खेटे मारावी लागतात. त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा वाया जातो. अशावेळी शासनाने सामान्य नागरिकांना वेळेत आणि एकाच दिवशी सर्व शासकीय सेवा मिळाव्यात तसेच विविध समस्यांचा निपटारा व्हावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन शासनाच्या वतीने करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या शिबिराची अंमलबजावणी तालुक्यात करण्यात आली आहे.हे शिबिर वेगवेगळ्या चार टप्प्यांमध्ये होणार आहे. पहिल्या टप्प्यात

दिनांक ७ मार्च रोजी आवलगांव, दि.१४ मार्च रोजी वडगांव, दि.१० एप्रिल रोजी शेळगांव, दि.८ मे रोजी सोनपेठ या ठिकाणी सकाळी ११ वाजल्यापासून शिबिराची सुरुवात होणार आहे.

शिबिरामध्ये उपलब्ध सेवा

१. रस्ते विषयक अडचणींच निवारण
२. जिवंत ७/१२ मोहीम
३. सामाजिक अर्थसहाय्य योजनांसाठी(संगायो/ श्रावणबाळ) अर्ज स्वीकारणे तसेच हयात प्रमाणपत्र स्वीकारणे
४. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दाखल्यांचे अर्ज स्वीकारणे
५. योजना
६. मंजूर फेरफार प्रकरणांतील ७/१२, फेरफार उतारा व खाते उतारा वाटप
७. ७/१२ मधील त्रुटी संदर्भात अर्ज स्वीकारणे ७/१२ दुरुस्ती प्रकरणे
८. डिजिटल ७/१२ च्या कायदेशीर वैधतेबाबत जनजागृती
९. भोगवटदार वर्ग २ जमीन वर्ग १ मध्ये रूपांतर मार्गदर्शन तसेच आवश्यक अधिकार अभिलेख उपलब्ध करून देणे
१०. तुकडेबंदी कायद्यानुसार जमीन व्यवहार नियमितीकरण मार्गदर्शन
११. अकृषक तरतुदी () संदर्भातील मार्गदर्शन
१२. पुरवठा विभागात संदर्भातील रेशन कार्ड विषयक अर्ज
१३. नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई पूर्ण करणे
१४ नवीन मतदार नोंदणी करणे
१५. किसान (लँड सिडींग, आधार सीडींग, करणे)
१६. आरोग्यविषयक (आभा कार्ड )
१७. इतर सर्व प्रशासकीय अर्ज.

सोनपेठ तालुक्यातील सर्व ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित शिबिर स्थळी उपस्थित राहून शासनाच्या या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन सोनपेठ चे तहसीलदार सुनील कावरखे यांनी केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात नायब तहसीलदार,मंडळ अधिकारी, तलाठी, मंडल स्तरावरील कर्मचारी, आणि महसूल विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या प्रलंबित फेरफार, सातबारा दुरुस्ती, दाखले आणि जमिनीशी संबंधित तक्रारींचा जागेवरच निपटारा करतात. हे शिबिर सामान्य जनतेसाठी (शेतकरी, महिला, विद्यार्थी) आयोजित केले जाते, जिथे प्रशासनाचे प्रतिनिधी थेट लोकांशी संवाद साधतात.

## तांड्याच्या विकासासाठी कमी पडणार नाही पालकमंत्री- मेघना साकोरे बोर्डीकर



**जिंतूर,/प्रतिनिधी :-** जिंतूर तालुक्यातील कुऱ्हाडी, पिंपळगाव तांड्यावर परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्य मंत्री.सौ. मेघनादीदी साकोरे बोर्डीकर यांची होळी साजरी झाली.पारंपारिक लेंगी गात डफड्याच्या तालावर पाऊली खेळणाऱ्या महिलांमध्ये बंजारा ड्रेस परिधान करून मेघनादीदी सहभागी झाल्याने महिलांचा आनंद द्विगुणित झाला.

बंजारा संस्कृती आणि परंपरेचा सर्वात मोठा सण असणाऱ्या होळीमध्ये मेघनादीदी नेहमीच तांड्यावर असतात.यावेळी जिल्हा परिषद सदस्य रोहित चव्हाण यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.त्या वेळी वसंतराव नाईक तांडा वस्ती जिल्हाध्यक्ष. विकास जाधव अंबरवाडीकर सरपंच. संतोष राठोड,रामभाऊ जाधव, गजानन चव्हाण,माधव राठोड, सचिन आडे,सुधाकर जाधव तसेच बंजारा समाजातील महिला व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना पालकमंत्री म्हणाल्या की मी समाजकारण ८० टक्के व २० टक्के राजकारण करते बंजारा समाजाच्या विविध समस्या आहेत त्या देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब यांच्या माध्यमातून मी तांडा वस्ती वरील सर्व कामे यशस्वीरित्या पार पाडणार आहे व तांड्याच्याविकासासाठी मी कधीही कमी पडणार नाही.

प्रत्येक वर्षी ऊसतोड मजुराची संख्या ही कमी झाली पाहिजे त्या साठी मी पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी म्हटले व बंजाराच्या समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असे त्यांनी बंजारा समाजा च्या होळीनिमित्त कार्यक्रमात बोलतांना सांगितले.

## पूर्णा तालुक्यात युरिया खताची टंचाई

**परभणी,/प्रतिनिधी:** पूर्णा तालुक्यात युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण झाली असून बाजारात चक्क २६६ ची बॅग साडेतीनशे रुपयाला विकली जात असून या प्रकाराकडे तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे दुर्लक्ष होत असून त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून शेतकऱ्याची व्यापाऱ्यांकडून मोठी आर्थिक पिळवणूक केली जात आहे.



पूर्णा शहरासह तालुक्यातील विविध भागातून मोंढा बाजारामध्ये सध्या कृषी केंद्र व्यापाऱ्याकडून युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण केल्यामुळे शेतकरी वर्ग परेशान झालेला आहे बाजारात युरिया खताची मागणी केली असता युरिया खत उपलब्ध नाही असे सांगितले जाते परंतु या युरिया खताच्या बॅगला साडेतीनशे रुपये दिल्यानंतर मात्र शेतकऱ्यांना युरिया खत दिल्या जात आहे त्याचप्रमाणे युरिया खतासोबत इतर खत घेण्याची सकती व्यापाऱ्यांकडून केली जात आहे याबाबत तालुका कृषी अधिकारी अनेक शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत परंतु कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे शेतकऱ्यांना युरिया खत मिळत नसल्यामुळे शेतकरी वर्ग हैराण झाला आहे शासनाने खतावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन केलेला असतानाही सध्या बाजारात खताची टंचाई निर्माण केली जात आहे याकडे जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन शेतकऱ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबवण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

## मंदिरात चोरी करताना आरोपी सीसीटीव्हीत कैद : नानलपेठ पोलिसांत गुन्हा दाखल

**परभणी ,/प्रतिनिधी:** शहरातील मराठवाडा प्लॉट परिसरातील हनुमान मंदिरातील महादेव पिंडीवरील चांदीचा टोप, चांदीचा नाग तसेच पितळी समई चोरी केल्याची घटना उघडकीस आली असून आरोपी मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या प्रकरणी बुधवारी (दि. ४) नानलपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सामाजिक कार्यकर्ते विजय पानबुडे यांना २८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास फोनवरून माहिती मिळाली की साने चौक येथील सार्वजनिक हनुमान मंदिरात दान म्हणून मिळालेली पितळी समई, महादेव पिंडीवरील चांदीचा टोप आणि चांदीचा नाग पिशवीत टाकून एक व्यक्ती घेऊन जात असताना तो सीसीटीव्हीमध्ये दिसून आला आहे. त्यानंतर पानबुडे यांनी मंदिर परिसरात जाऊन सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता आरोपी अंदाजे पाचशे ग्रॅम वजनाची पितळी समई तसेच चांदीचा टोप आणि नाग असा सुमारे १३ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेत असल्याचे दिसून आले.

दरम्यान, शहरातील शनिवार बाजार परिसरातील महादेव मंदिर व रेणुका माता मंदिरातील पितळी समई चोरी करताना मंदिर समितीच्या अध्यक्षा शिलाबाई शेटे यांनी संशयिताला पकडले होते. त्याचे फोटो शहरातील पुजारी व मंदिर समितीच्या समूहात प्रसारित करण्यात आले. त्यानंतर हनुमान मंदिर, महादेव मंदिर व रेणुका माता मंदिरातील चोरी करणारा आरोपी एकच असल्याचे समोर आले. त्याचे नाव आत्माराम उर्फ राजू सिताराम मांगुळकर (रा. पेनूर, ता. लोहा, जि. नांदेड; सध्या मुक्काम गणेशपार परिसर, परळी जि. बीड) असे असल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारीनुसार आरोपीने २७ डिसेंबर २०२५ रोजी रेणुका माता मंदिरातील महादेव पिंडीवरील तांब्याचा नागही चोरल्याचे नमूद करण्यात आले असून दोन्ही मंदिरांतील मिळून सुमारे १८ हजार रुपयांचे साहित्य चोरीस गेल्याचे सांगितले आहे.

या प्रकरणी विजय माधवराव पानबुडे यांच्या फिर्यादीवरून नानलपेठ पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक अर्जुन पवार करीत आहेत.

## अग्रलेख...

# संकल्पांचे स्वप्नचित्र

देशाचा किंवा कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प सादर होणे हा केवळ एक वार्षिक उपचार नसतो. अर्थसंकल्प ही अभ्यास करण्याची आणि समजून घेण्याची बाब असते. महाराष्ट्राचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प आज विधिमंडळात सादर होईल. यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतःच अर्थसंकल्प मांडणार असल्याने राज्याचे वास्तविक अर्थचित्र, सरकारचे संकल्प व भविष्यातील महाराष्ट्र अशा तीन बाबींचा विचार करून हा अर्थसंकल्प साजरा होणार आहे. कालपरवापर्यंत अर्थसंकल्प समजून घेणे सर्वसामान्यांस सोपे वाटत नसे. माध्यमांनी रंगविलेल्या त्या चित्रातून, केवळ रुपया कसा येणार आणि कसा जाणार एवढ्या आलेखातून अर्थसंकल्पाचा अर्थ शोधण्याच्या क्षमता मर्यादित राहिल्या होत्या. काही वेळा राजकीय नेत्यांनाही हाच संभ्रम पडत होता. म्हणूनच विरोधकांनी अर्थसंकल्पावर टीका करावी आणि सत्ताधाऱ्यांनी स्तुतिसुमने उधळावीत एवढाच उपचार अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर पार पाडला जात असे. आजही विरोधकांकडून फारशा वेगळ्या प्रतिक्रिया येतील, असे संभवत नाही. महायुती सरकारचा यंदाचा अर्थसंकल्प, महाराष्ट्राच्या विकासाचा, उन्नतीचा, समाजाच्या हिताचा आणि सर्व समाजघटकांना न्याय देणारा असावा, ही ढोबळपणे सामान्य जनतेची अपेक्षा आहे. राज्याच्या तिजोरीत किती निधी जमा होणार, राज्याच्या डोक्यावरील कर्जाचा किती बोजा जनतेच्या शिरावर असणार, महसुलाचा किंवा खर्चाच्या तरतुदींचा नेमका विनियोग कसा होणार, त्यातून जनतेला काय मिळणार या नेहमीच्या प्रश्नांची उत्तरे अर्थसंकल्पातून मिळावीत, ही जनतेची अपेक्षा आहेच; पण ज्या घटकांच्या उन्नतीकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, त्यांना झुकते माप देणे आणि त्यासाठी जेथून महसूल उभा करता येईल तेथे नेमका हात घालतानाही त्यांचे चटके बसणार नाहीत, याची काळजी घेण्याची खुबीदार कसरत सरकार कसे करणार, याकडेही जनतेचे लक्ष असणार आहे.

आजवरच्या प्रत्येक अर्थसंकल्पाने पुढील वर्षाच्या संकल्पांचे एक स्वप्नचित्र रंगविले. दरवर्षी या निमित्ताने आव्हाने आणि समस्यांवर मात करण्याचा संकल्प सोडला जातो आणि अपेक्षेप्रमाणेच साचेबद्ध प्रतिक्रिया व्यक्त होतात. सामान्यांच्या तोंडाला पाने पुसणारा, गरिबाला अधिक गरीब करणारा आणि श्रीमंतांची तिजोरी भरणारा अर्थसंकल्प, नव्या बाटलीत जुनी दारू, अशा ठरावीक प्रतिक्रिया विरोधकांनी व्यक्त करायच्या. तर, विकासाला चालना देणारा, सामान्यांना दिलासा देणारा, समाजाच्या प्रत्येक घटकाची काळजी वाहणारा अशा शब्दांत सत्ताधाऱ्यांनी अर्थसंकल्पावर स्तुतिसुमने उधळायची. 'रुपया असा आला आणि असा गेला' छाप विश्लेषणाशी सामान्य माणसाच्या खिशात येणाऱ्या आणि जाणाऱ्या रुपयाचा काडीचाही संबंध राहात नाही, हे वास्तव आहे. दैनंदिन जगणे सुकर करणाऱ्या पायाभूत सुविधा, नव्या करांचा बोजा, महागाई अशा जेमतेम ढोबळ चिंतेपुरतेच सामान्य माणसाचे अर्थसंकल्पावर लक्ष असते. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी लोकांच्या हाती पैसा खेळता राहिला पाहिजे, हा अर्थशास्त्राचा एक सामान्य सिद्धान्त असतो. लोकांच्या हाती पैसा असेल तर त्यांची क्रयशक्ती वाढते, खर्च करण्याची सवय वाढते आणि बाजारपेठांतील मागणी वाढून उत्पादनास चालना मिळते. उत्पादन वाढले की रोजगाराच्या संधी वाढतात आणि रोजगारांमुळे पुन्हा लोकांच्या हाती पैसा खेळू लागतो, हे सामान्य सूत्र नेमके जाणून महाराष्ट्राच्या विकासाच्या आणि नव्या संधींच्या काही प्रस्तावित योजना अर्थव्यवस्थेस चालना देणाऱ्या ठरतील, असे अपेक्षाचित्र अलिकडच्या फडणवीस सरकारच्या धोरणांतून दिसू लागले आहे. दावोस परिषदेत झालेले गुंतवणुकीचे करार पाहता, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील पायाभूत सुविधांचा विकास हा आगामी वर्षातील प्राधान्याचा मुद्दा राहणार आहे. यासाठी राज्याच्या तिजोरीवरील अर्थहीन अर्थभाराचा बोजा हलका करण्याकरिता काही योजना खुबीने आखाव्या लागतील. लाडकी बहीण योजना हा महिलांच्या सक्षमीकरणाचा चांगला प्रयत्न असला, तरी त्यामध्ये झालेल्या घुसखोरीचा मोठा फटका राज्याच्या तिजोरीवर बसला आहे. म्हणूनच या योजनेची संपूर्ण फेररचना करावी लागेल. शेतकऱ्यांच्या समस्या, कुपोषण, आरोग्य सुविधांचा अभाव आदी काही बाबी महाराष्ट्राच्या मानगुटीवर दीर्घकाळापासून ठाण मांडून राहिलेल्या आहेत. प्रत्येक अर्थसंकल्पात त्यावर काही उपाययोजनांच्या घोषणा होतात. पण भळभळत्या जखमा केवळ फुंकर मारून बऱ्या होत नाहीत. त्यासाठी जालीम उपचारांचीच गरज असते. निवडणुका वगैरेंच्या हंगामात असे कठोर निर्णय लादल्यास ते पचविणे राजकीयदृष्ट्या अवघड असते. आता फडणवीस सरकारचा पुढचा कार्यकाळ राजकीयदृष्ट्या बराचसा निर्धोक झालेला असल्याने, विकासाच्या योजनांना प्राधान्य देण्यासाठी काही लोकानुनयी योजनांची कठोर छाननी आणि फेरआखणी करण्याची संधी यातून साधली जाईल. केवळ भाषणे, घोषणा, प्रतिज्ञा आणि कागदी योजना सक्षमीकरणासाठी सक्षम नाहीत. त्यासाठी जनतेची क्रयशक्ती वाढली पाहिजे, हे ओळखून विकास योजनांना प्राधान्य दिले, तर रोजगाराच्या संधी वाढून जीवनमान उंचावण्यास हातभार लागतो. यंदा फडणवीस सरकार त्यावर लक्ष केंद्रित करेल, अशी अपेक्षा आहे.

आणखी दोन दिवसांनी राज्यात जागतिक महिला दिन राज्यात साजरा होईल. केवळ भाषणे, महिला सक्षमीकरणाच्या घोषणा, प्रतिज्ञा आणि कागदी योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी सक्षम नाहीत. त्यासाठी महिलांची क्रयशक्ती वाढली पाहिजे. लाडकी बहीण योजनेसोबत महिलांच्या रोजगाराच्या संधींची क्षितिजे विस्तारली, तर ते महाराष्ट्राचे वेगळेपण ठरेल. दिव्यांगांना व्यवसाय करात सूट, करांची थकबाकी असलेल्या व्यापाऱ्यांसाठी अभय योजना आदी योजनांतून सरकारने अर्थव्यवस्थेला गती देण्याचा धाडसी प्रयत्न याआधी फडणवीस सरकारने केला आहे. त्याचा आढावा घेऊन अधिक काही योजना यंदा अपेक्षित आहेत. राज्याचा किंवा केंद्राचा अर्थसंकल्प सादर झाला, म्हणजे सरकारांच्या तिजोरीत प्रत्येक रुपया कसा येतो आणि त्याच्या खर्चाच्या वाटा कशा असतात, याचा मागोवा घेणे क्रमप्राप्तच असते. तिजोरीत येणाऱ्या प्रत्येक रुपयाच्या वाटा अगोदरच नेमकेपणाने ठरवून दिलेल्या असतील आणि तिजोरीतील प्रत्येक रुपयाने कोणत्या वाटेने कोठे जायचे हे अगोदरच विचारपूर्वक ठरलेले असेल, तरच अर्थकारणाला शिस्त लागते. या शिस्तीचे भान ठेवून शेतकरी, महिला, आदिवासी, मागासवर्गीय, ओबीसी यांसह सर्व समाजघटकांच्या सर्वसमावेशक विकासाचे संकल्पचित्र या नव्या अर्थसंकल्पात दिसेल, अशीही अपेक्षा आहे. भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधांचा विकास, सक्षम, कुशल आणि रोजगारक्षम युवा पिढी घडविणारी कौशल्याधारित शिक्षण पद्धती आणि पर्यावरणाचे भान हे राज्याच्या अर्थसंकल्पाचे पंचामृत आहे, असा दावा काही वर्षांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी केला होता. चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि काजूपासून कापसापर्यंत प्रत्येक पिकाचे उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्याच्या समस्या सोडविण्यासाठी काही निश्चित योजना सरकारकडे आहेत, असेही सांगितले जात होते. भावनिक मुद्यांच्या जंजाळात गुरफटल्यावर रोजच्या जगण्यातील समस्यांची जाणीव काहीशी बोथट होत जाते. पण आता महाराष्ट्र थांबणार नाही ही मुख्यमंत्र्यांचीच प्रतिज्ञा असल्याने आभासी सुखाच्या कल्पना न कुरवाळता किंवा वास्तविकतेचा विसर पाडणाऱ्या कल्पनांचे अवडंबर माजविणाऱ्या भावनिकतेला थारा न देता, खऱ्या समस्यांचा मागोवा घेत, त्यावर फुंकर मारून राज्याबरोबर राज्यातील प्रत्येक समाजघटकाला, प्रत्येक कुटुंबास काही देऊ करण्याचा प्रयत्न स्वप्नचित्रात दिसला, तर त्याचे स्वागतच होईल. राज्यातील सर्व समुदायांतील सर्व घटकांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही सरकारने सातत्याने दिली आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या योजना परिणामकारकपणे, पारदर्शीपणाने व प्रामाणिकपणे राबविणे, नवीन विशेष योजना आखणे व त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करणे हे महायुती सरकारचे धोरण आहे. सर्व स्वरूपातील सार्वत्रिक दारिद्र्य दूर करून शाश्वत सामाजिक विकास साधणे हे सरकारचे ध्येय आहे, अशी ग्वाही सरकारने विधिमंडळातही अनेकदा दिली आहे. या ग्वाहीची जाणीव कृतिशील योजनांच्या आखणीतून प्रामाणिकपणे प्रतिबिंबित होईल, अशा अपेक्षा करावयास हरकत नाही.

---

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# राष्ट्रीय सुरक्षेसाठी 'गांडीव एआय'

भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षेला अधिक सक्षम, वेगवान आणि तंत्रज्ञानाधारित बनवण्यासाठी 'नॅटग्रीड' या राष्ट्रीय गुप्तचर जाळ्याला अधिक बळकट केले असून त्यामध्ये 'गांडीव' या उच्च अचूकतेच्या कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा समावेश केला आहे. नॅटग्रीड म्हणजे देशातील विविध महत्त्वाच्या माहिती संचांना जोडणारी व्यापक विश्लेषण प्रणाली होय. आधार, पॅन, बँक खाती, मालमत्ता नोंदी, प्रवास इतिहास, दूरसंचार ग्राहक पडताळणी यासह २० पेक्षा अधिक माहिती भांडार एकत्र आणून संशयास्पद हालचालींचे विश्लेषण करण्याचे कार्य या जाळ्यामार्फत केले जाते. आजच्या युगात युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही, तर माहिती तंत्रज्ञान आणि सायबर अवकाशातही तितक्याच प्रबळपणे खेळले जाते. अशा बदलत्या परिस्थितीत भारताने स्वतःची संरक्षण यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी 'गांडीव एआय'सारख्या प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांचा विकास आणि वापर करण्यास सुरुवात केली आहे. महाभारतातील अर्जुनाचे गांडीव हे धनुष्य अचूकता आणि शक्तीचे प्रतीक होते; तसेच हे एआय साधन भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी एक अभेद्य ढाल म्हणून काम करीत आहे. 'गांडीव एआय' हे प्रामुख्याने लष्करी आणि गुप्तचर संस्थांसाठी विकसित केलेले एक अत्यंत प्रगत माहिती विश्लेषण साधन आहे. हे साधन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या विदा (डेटा) संग्रहातून अत्यंत कमी वेळेत शत्रूच्या हालचालींचा वेध घेते. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित शिक्षण आणि विदा विश्लेषणाचे प्रगत तंत्र वापरले गेले आहे. हे केवळ एक सॉफ्टवेअर नसून भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षक आहे.

'आत्मनिर्भर भारत' मोहिमेंतर्गत अशा स्वदेशी साधनांची निर्मिती होणे ही अभिमानाची बाब आहे. यामुळे आपण परकीय तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी करू शकलो आहोत. भविष्यात हे साधन अधिक प्रगत होऊन अंतराळ सुरक्षा आणि आधुनिक युद्धाच्या सर्व आघाड्यांवर भारताचे नेतृत्व करेल. राष्ट्रीय सुरक्षा ही आता केवळ बंदुकांच्या जोरावर नाही, तर बुद्धिमत्तेच्या आणि अचूक माहितीच्या जोरावर जपली जाणार आहे. नव्या युगातील अस्त्र म्हणून भारताला जागतिक महासत्ता बनविण्यासाठी नक्कीच बळ देईल. गांडीव ही या जाळ्याची विचारशक्ती मानली जाते. पारंपरिक पद्धतीने वेगवेगळ्या विभागांकडील माहिती स्वतंत्र स्वरूपात साठवली जात होती. त्या माहितीमध्ये परस्परसंबंध शोधणे हे वेळखाऊ आणि कष्टसाध्य काम होते. गांडीव प्रणाली मात्र विविध स्रोतांमधील माहिती एकत्र करून त्यातील नमुने, संबंध आणि विसंगती ओळखते. त्याद्वारे एखाद्या व्यक्तीचे आर्थिक व्यवहार, प्रवासाची वारंवारता, संपर्क जाळे किंवा मालमत्तेतील बदल यांचा परस्परसंबंध तपासून संभाव्य धोक्यांचा अंदाज आधीच बांधता येतो.





आर्थिक गुन्हेगार सहसा अत्यंत क्लिष्ट मार्गांनी पैसे लंपास करतात. 'गांडीव एआय' अशा गुंतागुंतीच्या व्यवहारांचा मागोवा घेण्यासाठी हुशारीने कार्य करते. सर्वप्रथम ते संशयास्पद व्यवहारांचा शोध घेते. हे साधन बँकिंग प्रणालीतील लाखो व्यवहारांचे रिअल-टाइम (तत्काळ) विश्लेषण करते. एखाद्या खात्यातून अचानक होणारे मोठे व्यवहार किंवा अनोळखी ठिकाणांहून होणारे लॉगिन यावर हे साधन लक्ष ठेवते. एखादा व्यवहार सामान्य वर्तणुकीपेक्षा वेगळा वाटल्यास हे साधन त्वरित इशारा देते. त्यानंतर ते मनी लॉण्ड्रिंग प्रतिबंध करते. अवैध मार्गाने कमावलेला पैसा कायदेशीर दाखविण्यासाठी गुन्हेगार पैशांचे अनेक स्तर तयार करतात. 'गांडीव एआय' या पैशांच्या प्रवासाचा माग काढते. त्याचबरोबर क्रेडिट कार्ड आणि विमा फसवणुकीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करते. अनेकदा बनावट कागदपत्रांच्या आधारे विमा हप्ते लाटणे किंवा क्रेडिट कार्डचा चुकीचा वापर करणे असे प्रकार घडतात. 'गांडीव एआय' अर्जदाराची पृष्ठभूमी आणि जुन्या नोंदी तपासून फसवणुकीची शक्यता वर्तवते. ते केवळ माहिती साठवत नाही तर माहिती समजूनही घेते. कार्यपद्धती विदा संकलन, जोखीम मूल्यांकन आणि अचूक अंदाज या तीन मुख्य स्तरांवर चालते. विदा संकलनामध्ये बँका, शेअर बाजार आणि डिजिटल वॉलेटमधून मिळणारी माहिती संकलित केली जाते.

पुढील प्रक्रियेमध्ये जोखीम मूल्यांकनमध्ये प्रत्येक व्यवहाराला एक धोका गुणांक दिला जातो. हा गुणांक ठरावीक मर्यादेच्या पलीकडे गेल्यास संबंधित व्यवहार रोखला जातो. अचूक अंदाजात ऐतिहासिक विदा वापरून भविष्यात कोणत्या प्रकारचे सायबर हल्ले किंवा फसवणूक होऊ शकते, याचा अंदाज आधीच वर्तविला जातो. 'गांडीव एआय'मुळे बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राला बरेच फायदे होतात. सविस्तर माहिती आणि त्वरित प्रतिसाद हे या प्रणालीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. त्यामुळे यात फसवणूक झाल्यानंतर तपास करण्यापेक्षा ती घडत असतानाच रोखणे शक्य होते. ही प्रणाली वापरल्यामुळे अत्यंत कमी मनुष्यबळ लागते आणि वेळेतही मोठी बचत होते. एखादे काम करण्यासाठी हजारो कर्मचाऱ्यांनाही काही दिवस लागू शकतात, ते काम ही एआय प्रणाली काही सेकंदात करते. या प्रणालीमुळे मोठी अचूकता साधता येते. मानवी चुकांमुळे एखादा संशयास्पद व्यवहार नजरेतून सुटू शकतो, पण एआय सूक्ष्म विसंगतीही शोधते. शिवाय आर्थिक व्यवहार सुरक्षित झाल्यामुळे सामान्य नागरिकांचा डिजिटल प्रणालीवर विश्वास वाढतो. या प्रणालीचा उपयोग देशातील ११ केंद्रीय संस्थांकडून केला जातो.

गांडीव प्रणाली हीच प्रक्रिया सुलभ करते. देशात डिजिटल व्यवहार आणि ऑनलाईन सेवा वाढत असताना आर्थिक व सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. लाखो कोटी रुपयांची फसवणूक, बनावट खात्यांद्वारे निधी वळवणे, आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या आडून बेकायदेशीर हालचाली करणे अशा अनेक घटना घडत आहेत. या पृष्ठभूमीवर नॅटग्रीडसारखी एकात्मिक माहिती प्रणाली अत्यावश्यक ठरते. एखादी संशयित व्यक्ती वेगवेगळ्या नावांनी किंवा ओळखपत्रांनी व्यवहार करत असेल तर विविध माहिती भांडारांमधील तपशील जुळवून तिची खरी ओळख निश्चित करता येते. गांडीव प्रणालीचे आणखी महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माहितीतील सूक्ष्म नमुने शोधण्याची क्षमता. अनेकदा गुन्हेगार लहान-लहान व्यवहारांद्वारे मोठा गैरव्यवहार लपवतात. परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित विश्लेषण पद्धती अशा व्यवहारांची वारंवारता, वेळ, रक्कम आणि संबंधित व्यक्तींचे जाळे तपासून संशयास्पद व्यवहार ओळखू शकते. यामुळे तपास यंत्रणांना अधिक नेमकेपणाने कारवाई करता येते. तथापि, अशा व्यापक माहिती संकलन प्रणालीचा विचार करताना गोपनीयता आणि नागरी स्वातंत्र्य याविषयी चर्चा होणे स्वाभाविक आहे. नागरिकांची वैयक्तिक माहिती सुरक्षित राखणे, तिचा गैरवापर टाळणे आणि कायदेशीर चौकटीतच उपयोग करणे ही शासनाची जबाबदारी आहे. कठोर नियंत्रण व्यवस्था, अधिकृत प्रवेशाची मर्यादा आणि नोंदींची तपासणी या माध्यमातून पारदर्शकता राखणे आवश्यक ठरते. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांचा समतोल साधणे हे लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# मोसाद... इस्रायलचे धुरंधर

देश-विदेशातील गुप्तहेर यंत्रणांचे स्वतःचे असे जग आहे. त्या जगात विविध पातळ्यांवर सतत संघर्ष सुरू असतो. 'धुरंधर' चित्रपटामुळे हा संघर्ष काही अंशी जनतेसमोर आला आणि त्या संघर्षातून मिळणारे यश 'ऑपरेशन सिंदूर'ने दाखविले. अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण विरुद्ध आखाती देश असे गुंतागुंतीच्या समीकरणांचे महायुद्ध सुरू आहे. लष्करी तळांवर हवाई हल्ले करता करता, आर्थिक आणि मनोवैज्ञानिक स्तरावर सर्जिकल स्ट्राईक करण्यात सर्वच सहभागी देश अग्रेसर आहेत. मध्य-पूर्वेतील शांतता, आर्थिक स्थैर्य, व्यापार आणि दैनंदिन जीवनमान ढवळून काढणाऱ्या एकमेव घटनेमागे इस्रायलच्या अज्ञात धुरंधरांची किमान ३ ते ४ वर्षांची मेहनत आहे. त्यांचे राष्ट्रप्रेम आणि परिणामकारक रहस्यमयी कारवायांचा वेध घेणे आवश्यक आहे.

इराणच्या सर्वोच्च नेत्यासह त्याचे कुटुंब, प्रमुख सहकारी वगैरे मंडळींना जन्नतमध्ये धाडणाऱ्या हल्ल्याचे नियोजन आता उघड होत आहे. आपल्या रॉ सारखी इराणची मोसाद ही संस्था आहे. गुप्त माहिती व विशेष कार्य संस्था असा अर्थ असलेला 'मोसाद' हा शब्द मूळतः हिब्रू भाषेतील आहे. आक्रमक इस्लामिक राष्ट्रांनी वेढलेल्या इस्रायलच्या राष्ट्रीय सुरक्षेत मोसादची भूमिका नेहमीच राहिली. या संस्थेच्या कारवायांभोवती गूढता, धाडस, वाद आणि राजकारणाचे वलय राहिले आहे. मोसादची स्थापना १९४९ मध्ये इस्रायलचे पहिले पंतप्रधान डेव्हिड बेन गुरीओन् यांच्या पुढाकाराने झाली. हेरगिरीसोबतच जगभरातील ज्यू समुदायाच्या सुरक्षेसाठी मदत करणे, ही मोसादची प्राथमिकता राहिलेली आहे. वर्ष १९६० च्या नाझी अधिकारी ॲडॉल्फ आयखमन पकड मोहिमेनंतर मोसाद चर्चेत आली. १९७२ मध्ये म्युनिच ऑलिम्पिक्स हत्याकांडानंतर ईश्वराचा वाईटाविषयीचा संताप ऑपरेशन अर्थात रॅथ ऑफ गॉड हे १-२ नाही तर जगाच्या कानाकोपऱ्यातील दहशतवाद्यांविरोधात सर्जिकल स्ट्राईक ठरले. त्यानंतर वर्ष १९७६ मध्ये ऑपरेशन एंटेबे करून युगांडातील एंटेबे विमानतळावर ओलिस ठेवलेल्या प्रवाशांची सुटका करण्यात आली. या कारवाईत भावाला गमविणारे बेंजामिन नेतान्याहू यांचा इस्रायलच्या राजकारणात उदय झाला.

इराणमधील अनेक अणुशास्त्रज्ञांवर गेल्या दशकात हल्ले झाले. विशेषतः २०२० मध्ये मोहसिन फख्रीजदेह यांच्या हत्येने जगाचे लक्ष वेधले. तत्पूर्वी २०१८ मध्ये इस्रायलचे पंतप्रधान यांनी जाहीर केले की, मोसादने तेहरानमधून इराणच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित गुप्त कागदपत्रे हस्तगत केली. या दाव्यामुळे इराणची सुरक्षा यंत्रणा आणि नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभे राहिले. या सर्व कारवाया थेट कोण्या एका व्यक्तीवर नसल्या, तरी त्यांच्या धोरणात्मक आधारस्तंभांवर प्रहार करणाऱ्या नक्कीच होत्या. मोसादची कार्यपद्धती अत्यंत गोपनीय असून तांत्रिक गुप्तहेरगिरी, सायबर हेरगिरी आणि मानवी स्रोतांचा गरजेनुसार वापर केला जातो. या संस्थेचा प्रमुख थेट इस्रायलच्या पंतप्रधानांना अहवाल देतो. मोसादच्या अनेक कारवाया आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने वादग्रस्त ठरल्या आहेत.

लक्ष्यित हत्याकांड, परदेशी सार्वभौमत्वाचे उल्लंघन आणि गुप्त कारवाया यांवरून अनेक देशांनी टीका केली तरीही इस्रायलच्या दृष्टीने त्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी आवश्यक मानल्या जातात. इस्रायल-इराण संघर्षाच्या पटावरील अदृश्य मोहरा म्हणजे मोसाद! अमेरिका आणि इस्रायलने नुकत्याच केलेल्या कारवाईमागे मोसाद सक्रिय होते आणि आहे, हे उघड सत्य आहे. या कारवाईची सुरुवात एका रात्रीतून झालेली नाही तर किमान तीन वर्षांपासून मोसादची यंत्रणा कार्यरत असावी, हे तज्ज्ञांचे मत आहे. इराणच्या शहरांमध्ये ट्राफीक कॅमेऱ्यांची यंत्रणा साधारण वर्षभरापासून हॅक झाली होती. इराणवरील हल्ल्यांच्या तासभर आधी मोबाईल टॉवर्सची यंत्रणा हॅक होऊन कोलमडली. महत्त्वाच्या व्यक्तींचे मोबाईल बिझी येऊ लागले. जगभरातील इराणी मुसलमानांना धार्मिक उपक्रमांची, नमाजच्या वेळांची माहिती देणारे 'बद-ए-सबा' नावाचे ॲप अमेरिकन हल्ल्यांनंतर हॅक झाले आणि त्यावरून 'हेल्प इज हिअर' अर्थात मदत तुमच्यापर्यंत पोहोचली आहे, हा संदेश व्हायरल झाला. या सगळ्यांमागे कोणती अदृश्य शक्ती आहे, हे सुज्ञांस सांगणे न लगे! मोसाद ही केवळ गुप्तहेर संस्था नाही, तर इस्रायलच्या अस्तित्वाशी निगडित सुरक्षाकवच आहे. मोसाद म्हणजे राष्ट्र सुरक्षेच्या उद्देशाने चालणाऱ्या अदृश्य युद्धाची कथा जी जगाच्या पडद्यामागे सतत सुरू असते. मध्यपूर्वेतील राजकारण हे उघड युद्धांपेक्षा अधिक धोकादायक अशा छुप्या संघर्षांवर उभे आहे. मोसादचा हा संघर्ष बंदुकीच्या आवाजाशिवाय चालणारे युद्ध आहे, ज्यात गोळ्या दिसत नाहीत; पण परिणाम दूरगामी असतात. मध्यपूर्वेतील स्थैर्य या अदृश्य रणांगणावरच ठरणार आहे, हे नक्की!

९८५०३३९२४०

---

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# शरद पवार संपले नाहीत

तुम्ही त्यांच्यावर प्रेम करा किंवा त्यांचा द्वेष करा, त्यांच्या नेटवर्किंगच्या कौशल्याबद्दल अचंबित व्हा किंवा ते कोणतीही गोष्ट मॅनेज करू शकतात म्हणून त्यांना मोडीत काढायचा प्रयत्न करा, पण देशाच्या राजकारणातून तुम्ही त्यांना बाजूला ठेवू शकत नाही. ही व्यक्ती म्हणजे शरद पवार. घटक पक्षांचा कडाडून विरोध असतानाही राज्यसभेची उमेदवारी खेचून शरद पवारांनी आपला दम दाखवून दिला. पवारांना उमेदवारी दिली नाही तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेम करतील आणि त्यात महाविकास आघाडीची मतं फुटतील या भयापोटी उद्धव ठाकरे आणि काँग्रेस शरण गेली. महाराष्ट्राच्या राजकारणाचा पट तर शरद पवार यांच्या भोवतीच गेली सहा दशके फिरत आहे. वयाच्या ८५ व्या वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाचा हा वयोवृद्ध नेता तिसऱ्यांदा बिनविरोध राज्यसभेवर जायला सज्ज झाला आहे. १९६७ मध्ये शरद पवार पहिल्यांदा आमदार झाले. तेव्हापासून सुरू त्यांची संसदीय कारकीर्द अखंड सुरू आहे. महाराष्ट्रात असताना शरद पवारांना स्वबळावर कधीही सरकार बनवता आले नाही. आताही ज्या महाविकास आघाडीने त्यांना राज्यसभेची उमेदवारी दिली आहे, त्या आघाडीमध्ये त्यांचे फक्त १० आमदार आहेत. हा माणूस काहीही करू शकतो या गोष्टीला राज्यसभेच्या त्यांच्या उमेदवारीने बळ मिळाले आहे. जेव्हा जेव्हा पवार संपले अशी परिस्थिती निर्माण होते तेव्हा तेव्हा पवार नव्या जोमाने उभारी घेताना दिसतात. आज तेच घडतंय का?

राज्यसभेच्या सात जागांसाठी महाराष्ट्रात १६ मार्च रोजी निवडणूक आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची ५ मार्च अखेरची मुदत होती. सात जागांपैकी सहा जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून जाणार आहेत. महाविकास आघाडीच्या वाट्याला केवळ एक जागा येणार आहे. तीही महाविकास आघाडी एकसंध राहिली तर! दोन दिवस आधीपर्यंत रणकंदन माजले होते. आदित्य ठाकरे यांनी या जागेवर दावा सांगितला होता. राज्यसभेतले विरोधी पक्षनेतेपद टिकविण्यासाठी काँग्रेसला ही जागा पाहिजे होती. आमचा पक्ष राष्ट्रीय आहे, असे विजय वडेट्टीवार सांगायचे. राज्यसभेत विरोधी पक्षनेत्याच्या पदावर दावा करायचा तर किमान २५ खासदार हवेत. सध्या राज्यसभेत काँग्रेसचे २७ खासदार आहेत. यात काही निवृत्त होत आहेत. सध्याचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांची मुदत जूनमध्ये संपते. काँग्रेसला ते टेन्शन होते. राज्यसभेच्या बदल्यात विधान परिषद घ्या, अशी ऑफर काँग्रेसने उद्धव ठाकरेंना दिली होती. महाविकास आघाडीकडे एकूण ४६ मतं होती आणि जिंकण्यासाठी ३७ मतांचा कोटा होता. एकच उमेदवार निवडून येऊ शकत होता. त्यासाठी तिन्ही पक्षांचे एकमत हवे होते. उबाठा आणि काँग्रेस, दोघेही दोन दिवस आधीपर्यंत जागा सोडायला तयार नव्हते. दोन राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाले तर शरद पवार एनडीएसोबत जातील, याची त्यांना भीती होती. अशा परिस्थितीत शरद पवारांच्या कन्या खासदार सुप्रिया सुळे 'ॲक्शन मोड'वर आल्या आणि पाहता पाहता चित्र बदलले. त्यांनी आधी दिल्लीत राहुल गांधी यांच्याकडे फिल्डिंग लावली. नंतर उद्धव ठाकरे यांना त्यांच्या 'मातोश्री'वर भेटल्या. पवार एनडीएमध्ये जाणार नाहीत, याची हमी दिली. 'विलीनीकरणाचा प्रश्नच आता उद्भवत नाही' असे राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी जाहीर केले तेव्हा उद्धव ठाकरे आणि दिल्लीतले काँग्रेस हायकमांड राजी झाले. शरद पवार उमेदवार नसतील तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेम करू शकतात ही भीतीही होतीच. त्यामुळे २४ तासात उद्धव ठाकरे आणि काँग्रेसने निर्णय फिरवला. तलवारी म्यान झाल्या. पण काय वेळ आली पहा शरद पवारांवर. नियतीचा खेळ पहा. या पवारांनी अनेकांना आमदार केले. अनेकांना खासदार केले. आज त्यांनाच एका खासदारकीसाठी एवढे अगतिक होण्याची वेळ आली. 'कुणी राज्यसभा देता का राज्यसभा?' असे ओरडून मागण्याची वेळ त्यांच्यावर का आली? शरद पवारांना या वयात राज्यसभेवर कशाकरिता जायचे आहे? शरीर थकले असले तरी म्हाताऱ्या पवारांचा मेंदू ठणठणीत आहे. खासदारकी खिशात नसेल तर कोणी विचारणार नाही, हे त्यांना चांगले ठाऊक आहे. आता राज्यसभेवर आले तर पक्षाच्या संसदीय पक्षाचे ते नेते असतील. त्यांच्या राष्ट्रवादीचे आठ खासदार आहेत. हे खासदार कधीही भाजपमध्ये पळतील याचे टेन्शन असणारच. अजितदादांच्या मृत्यूनंतर राजकारण खूप बदलले आहे. शरद पवारांना दोन राष्ट्रवादीचे विलीनीकरण हवे होते. त्या आडून त्यांना दोन्ही राष्ट्रवादीचा ताबा हवा होता. दादा अचानक गेल्याने सारे फिस्कटले. अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी चौथ्याच दिवशी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन आपल्याला सासऱ्याच्या सापळ्यात अडकायचे नाही, हे दाखवून दिले. सुनेत्रा यांचा मुलगा पार्थ याला शरद पवारांनी कधीही ताकद दिली नव्हती. त्यामुळे आता पार्थ शरद पवारांच्या नादी लागायचा प्रश्न नाही. पवारांपुढे अनेक प्रश्न आहेत. धड उठता येत नाही, ते काय बोलले ते समोरच्याला कळत नाही. या महिन्यात शरद पवार दोनदा रुग्णालयात भरती झाले होते. नातवंडांना खेळवण्याचेही त्यांचे वय संपले आहे. 'आता निवडणूक लढवणार नाही' असे त्यांनी नातू युगेन्द्रच्या प्रचारात जाहीर सभेत सांगितले होते. तरीही सत्तेचा मोह संपत नाही.



काही का असेना, पवारांच्या उमेदवारीमुळे राज्यसभा निवडणूक बिनविरोध होते आहे. भाजपाने चार जागांसाठी केंद्रीय सामाजिक न्याय खात्याचे राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते आणि मराठवाड्यातले माजी आमदार रामराव वडकुते यांना संधी दिली. देताना पुन्हा एकदा धक्कातंत्राचा वापर केला. दलित-आदिवासी, मराठा-ओबीसी हा जातीच्या समीकरणांचा तसेच प्रादेशिकतेचाही समतोल साधला आहे. वडकुते आणि इवनाते ही दोन्ही नावे अनपेक्षित होती. इवनाते या आदिवासी नेत्या आहेत. नागपूरच्या महापौर राहिल्या आहेत. वडकुते हे हिंगोलीचे धनगर समाजातले आहेत. पक्षाने तब्बल २८ नावं हायकमांडकडे पाठविली होती. त्यातून हे माणिकमोती हाती लागले आहेत. नगरसेवक ते खासदार हा प्रवास भाजपामध्येच होऊ शकतो याची पुन्हा एकदा प्रचीती आली. आपण राष्ट्रपती होऊ हे द्रौपदी मुर्मू यांनी स्वप्नातही पाहिले नव्हते. भाजपा तळागाळातल्या कार्यकर्त्यांना उचलतो हा संदेश पुन्हा एकदा देशभर गेला आहे. २०१९ मध्ये तिकीट नाकारल्यानंतर तावडे हे राज्यातून फेकले गेल्यासारखे होते. तरीही हिंमत न हारता या मराठा नेत्याने दिल्लीची वाट धरली. पक्ष संघटनेत काम सुरू ठेवले. फिनिक्स पक्ष्यासारखी त्यांची भरारी आहे. ज्याचे तिकीट कापले तो आता तिकिटं वाटू लागला. ५-६ वर्षे तोंडावर बोट ठेवून पक्षासाठी मेहनत घेतल्याचे फळ त्यांना उमेदवारीच्या रूपात मिळाले. दलित चळवळीतला यशस्वी नेता म्हणून रामदास आठवले यांच्याकडे पाहिले पाहिजे. एकूणच या यादीने बिनविरोध निवडणुकीचा मार्ग प्रशस्त केला, असेच म्हणावे लागेल.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

## वाचक पत्रे

### संस्कृती आणि परंपरा

भारतीय सण, परंपरा आणि इतिहास यांवर तरुण भारतात प्रकाशित होणारे लेख अत्यंत माहितीपूर्ण असतात. आम्ही तरुण भारतमधील लेख सातत्याने वाचतो. अशा लेखांमुळे आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटतो. त्यातून तरुणांना बरेच काही शिकायलाही मिळते. भविष्यात स्थानिक लोकपरंपरा आणि विस्मृतीत गेलेल्या व्यक्तींवर लेखमाला सुरू करावी. वैविध्य वैचारिक उपक्रम वृत्तपत्राच्या माध्यमातून राबवावेत, असे वाटते.

**संदीप रुपनवार**/पुणे

●● ●●

### संपादकीय स्तंभाचे कौतुक

तरुण भारतचा संपादकीय स्तंभ अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद असतो. तसाच तो थेट प्रहार करणारा असतो. कोणतीही मिळमिळीत भूमिका नसल्याने आम्हाला तो आवडतो. राष्ट्रीय घडामोडींवर स्पष्ट भूमिका मांडल्यामुळे वाचकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. निष्पक्षता आणि राष्ट्रहित या दोन मूल्यांची जपणूक तरुण भारतने केली आहे. या पुढेही व्हावी, ही अपेक्षा!

**मुरली देशपांडे**/पुणे

●● ●●

### महाराष्ट्राचे वृत्तपत्र व्हावे

आश्वासित केल्याप्रमाणे, नरकेसरी प्रकाशनाचा आपल्या तरुण भारताचा पहिला अंक आज सकाळी दारात पाहून अतिशय आनंद झाला आणि भरघोस २० पानी अंक आधाशासारखा वाचला. वाचनीय अग्रलेख व इतर लेख ही विशेषता या पहिल्या अंकातही तभाने जपली आहे, हे प्रथमदर्शनी जाणवले. पुण्यात आलेल्या नागपूरच्या तभा प्रतिनिधींनी वार्षिक वर्गणीदार बनवायला पुण्यातील वैदर्भीयांशी संपर्क केला होता. पण, पहिल्या अंकात विदर्भातील बातम्या नसल्याचे जाणवले. ही सुरुवात आहे, यथावकाश बुलढाणा ते गोंदिया जिल्ह्यातील बातम्या पुणे तभात येतील, अशी खात्री वाटते. विदर्भातीलच कशाला? पुण्या-मुंबईसह, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण अशा सर्व भागातील बातम्या राष्ट्रीय बातम्यांसह तभात येऊन तभा महाराष्ट्राचे वृत्तपत्र व्हावे, या सदिच्छेसह!

**दीपक एदलाबादकर**/९९२१५२७९१६

●● ●●

### ब्रिटनमधील लोकशाही...

ब्रिटनचे किंग चार्ल्स यांचे भाऊ माजी राजपुत्र अँड्र्यू माऊंटबॅटन विंडसर यांना तेथील पोलिसांनी अटक केली. लैंगिक गुन्हेगार एपस्टिन यांचेशी संबंध असल्याच्या संशयावरून झालेल्या या अटकेबाबत किंग चार्ल्स यांनी 'कायद्याला आपले काम करू द्या' अशी प्रतिक्रिया देऊन ब्रिटनमधील लोकशाहीला बळकटी दिली आहे. जगातील इतर लोकशाही देशापुढे एक आदर्श घालून दिला आहे. खरी लोकशाही ब्रिटनमध्ये राबविली जात आहे, असे वाटते.

**ॲड. बळवंत रानडे** /पुणे-९८८१४७३५८०

### हिंसाचार घातकच

महिलांनी कौटुंबिक अत्याचाराला बळी पडू नये, समाजामध्ये कौटुंबिक हिंसाचार घडू नये म्हणून केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा संपूर्ण भारतात लागू केला आहे. आज २० वर्षे झाली तरी महिलेच्या कौटुंबिक व सामाजिक हिंसाचाराच्या घटना कमी झालेल्या नाहीत; उलट वाढतच आहेत. कारण हे कायदे अजूनही समाजातील तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचलेले नाहीत. काही महिला बदनामीच्या भीतीने पुढे येत नाहीत. ज्या पुढे येतात त्यातील तपासात अधिकारी बऱ्याच त्रुटी ठेवतात कायद्याची माहिती सर्व थरातील महिलांपर्यंत पोहोचावी म्हणून जनजागृती मेळावे, चर्चा, परिषदा होणे गरजेचे आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/ ९४२१३१२२४४

●● ●●

### भारताने धडा घ्यावा

अमेरिका आणि इस्रायलच्या फौजांनी केलेल्या भ्याड हल्ल्यामध्ये इराणचे सर्वोच्च धार्मिक नेता अयातुल्ला खामेनेई, त्यांच्या कुटुंबातील लोक व सैन्यातील विविध अधिकारी मारले गेले. जगातील जो देश किंवा नेता अमेरिकेच्या हितसंबंधांमध्ये अडथळा निर्माण करतो त्याचा परिणाम काय होतो, हे अनेकदा दिसून आले आहे. इराण हे त्याचे ताजे उदाहरण आहे. हे हल्ले करताना इराणमधील 'जुलमी' सरकार उलथवून तेथे 'लोकशाही'चे सरकार स्थापन करण्याची केलेली घोषणा म्हणजे नैतिकतेचे ओढलेले पांघरूण आहे. मोदी सरकार भारतहिताला प्राधान्य देत आहे. ते अमेरिकेला पसंत पडत नाही. उद्या अमेरिकेसारखे स्वयंघोषित जागतिक फौजदार भारतालाही आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची शक्यता आहे. इराणमधील फुटीर गटांनी अमेरिकेला या हल्ल्यात मदत केली, तशीच मदत भारतातील भारतविरोधी शक्ती अमेरिकेला करू शकतात. भारताने सावध राहण्याची गरज आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# गेवराईत मोटार सायकल चोरणारे तीघे जेरबंद

## १७ मोटार सायकल, १६ सांगडे व ३० इंजिन असे एकूण ५० पेक्षा जास्त मोटार सायकल व पार्टसह २८ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

**बीड |** बीड जिल्ह्यातील गेवराई पोलिसांनी वाहन चोरीच्या गुन्ह्यात मोठी कारवाई करत आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला आहे. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉँवत यांनी जिल्ह्यातील मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने गेवराई पोलीस ठाण्याच्या शोध पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करून तीन अट्टल चोरट्यांना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील दोन महिन्यांपासून गेवराई शहर आणि परिसरात वाहन चोरीच्या घटना वाढल्या होत्या. या तपासासाठी पोलिसांनी परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. तपासाअंती ५ मार्च २०२६ रोजी तीन संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले. या आरोपींकडून १७ मोटार सायकल, १६ मोटार सायकल सांगडे (चेसिस) आणि ३० मोटार सायकल इंजिनसह विविध कंपनीचे सुटे भाग असा एकूण अंदाजे २५,००,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत: १) सय्यद अब्रार सय्यद जैनुद्दीन (वय ३१ वर्षे, व्यवसाय गॅरेज, रा. छत्रपती संभाजीनगर) २) सय्यद इमदाद हुसेन अर्शद हुसेन (वय २२ वर्षे, व्यवसाय प्लंबिंग, रा. मासूम कॉलनी, बीड) ३) शेख आसेम शेख मझर (वय ३२ वर्षे, व्यवसाय भंगारवाला, रा. नेकनूर, जिल्हा बीड). तपासात असे निष्पन्न झाले आहे की, आरोपी शेख आसेम शेख मझर हा चोरीची वाहने ताब्यात घेतल्यानंतर अवघ्या दोन तासात त्याचे सर्व पार्ट वेगवेगळे करून त्यांची विल्हेवाट लावत असे. ही चोरी केलेली वाहने बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यातील असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या प्रकरणातील एक आरोपी अद्याप फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि. दिपक लंके, सपोनि. संतोष जंजाळ, पोउपनि. प्रदीप आढाव आणि त्यांच्या पथकाने केली आहे.



- पोलिसांनी १७ मोटार सायकल, १६ सांगडे आणि ३० इंजिन असा एकूण ५० पेक्षा जास्त वाहनांचा साठा जप्त केला.
- जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत २५,००,०००/- रुपये इतकी आहे.
- सय्यद अब्रार, सय्यद इमदाद आणि शेख आसेम या तीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.
- चोरीची वाहने बीडसह छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातून चोरल्याचा संशय आहे.
- अवघ्या दोन तासात मोटार सायकलीचे पार्ट वेगळे करून विल्हेवाट लावणारी यंत्रणा पोलिसांनी उघड केली.

### वाहन चोरीचे मोठे रॅकेट उद्ध्वस्त

गेवराई पोलिसांनी वाहन चोरीच्या गुन्ह्यात मोठी यश मिळवले असून तीन आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून ५० पेक्षा जास्त मोटार सायकलींचे सुटे भाग आणि पूर्ण वाहने असा एकूण २५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पोलिसांनी या टोळीचा छडा लावला.

## मंत्री भरणे यांच्या सोबत आमदार सुरेश धस यांची बैठक



तभा वृत्तसेवा

**बीड, 06 मार्च |** महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात राज्यातील जैविक खते उत्पादक पुरवठा सहकारी संस्थांकडून झालेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीबाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत आमदार सुरेश धस यांची उपस्थिती होती

या बैठकीत राज्यातील काही जैविक खते उत्पादक पुरवठा सहकारी संस्थांकडून झालेल्या अनियमितता व भ्रष्टाचाराच्या तक्रारींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करणे व आवश्यक असल्यास त्यांच्या नोंदणी रद्द करण्याबाबत चर्चा झाली. या बैठकीदरम्यान शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून संबंधित प्रकरणांची निष्पक्ष व सखोल चौकशी व्हावी, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि भविष्यात अशा प्रकारच्या गैरप्रकारांना आळा बसावा याबाबत मुद्दे मांडले. शेतकऱ्यांच्या नावावर कोणताही भ्रष्टाचार खपवून घेतला जाणार नाही.अशी भूमिका बैठकीत मांडली. या बैठकीस कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, कृषी आयुक्तालय पुणे येथील आयुक्त, पणन संचालनालय पुणे येथील संचालक, पणन मंडळ पुणे येथील व्यवस्थापकीय संचालक तसेच कृषी विभागातील संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## बीड बसस्थानक परिसरात आढळला गांधीनगर भागातील नौशादचा मृतदेह

**बीड |** शहरातील अत्यंत गजबजलेल्या बसस्थानकाच्या पाठीमागील बाजूस एका २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. गांधी नगर परिसरातील असून, त्याचा खून झाल्याची प्राथमिक चर्चा परिसरात वर्तवली जात आहे. ही घटना शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तो उत्तरीय तपासणीसाठी पाठवला आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप अधिकृतरित्या स्पष्ट झाले नसले तरी, पोलीस सर्व बाजूंनी या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. भरवस्तीत अशा प्रकारे मृतदेह सापडल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला आहे. पोलीस प्रशासन या घटनेमागील सत्य शोधण्यासाठी आता प्रत्यक्षदर्शी आणि तांत्रिक पुराव्यांची मदत घेत आहे.

## पोलिस पाटील भरती : माजलगावात ७ ऐवजी ११ मार्चला मुलाखती

**बीड |** माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयांतर्गत रिक्त असलेल्या पोलिस पाटील पदभरती अनुषंगाने लेखी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचे वेळापत्रक पूर्वी निश्चित करण्यात आले होते. परंतु काही प्रशासकीय कारणास्तव ७ मार्च रोजी होणारी मुलाखत ११ मार्च रोजी होणार आहे. पोलीस पाटील पदभरतीची मुलाखत ७ मार्च २०२६ रोजी होणार होती. मात्र प्रशासकीय कारणास्तव सदरील ७मार्चची मुलाखत पुढे ढकलण्यात आली आहे. ती मुलाखत ११ मार्च रोजी सकाळी १० वाजेपासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी यांच्या दालनात घेण्यात येणार आहे. सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, मुलाखतीस उपस्थित राहताना ऑनलाईन प्रणालीवर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती सोबत आणणे बंधनकारक राहील.

## बलभीम अंधारे यांचे निधन



**अंबाजोगाई |** तालुक्यातील अंबासाखर कारखाणा येथील रहिवाशी बलभीम गुलाब अंधारे वय ४६वर्ष यांच्यावर स्वाराती रुग्णालयात उपचार सुरु आसताना अल्पशा आजाराने रविवारी सायंकाळी ६ वाजता प्राणज्योत मावळली. त्यांच्यावर सोमवारी सकाळी ११ वाजता नंदडी येथील स्मशानभुमीत दफनविधीने अंत्यसंस्कार भाच्चा रोहीत अंधारे याच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पंचक्रोशीतील बहुसंख्य नागरीकांची उपस्थिती होती.त्यांच्या पश्चात पत्नी सारिका अंधारे, मुलगी ओमिना अंधारे,दोन बहीण लैला अंधारे,प्रिया अंधारे या आसुन रोहीत अंधारे यांचे ते मामा होते.

## अपघातात एसटी चालक, वाहकसह तेरा प्रवासी जखमी

तभा वृत्तसेवा

**केज |** कळंब रोडवर साळेगाव पासून जवळ असलेल्या चिंचोली पाटी, हॉटेल लालपरी जवळ सकाळी ६:०० वाजता एका रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला कोल्हापूर माजलगाव गाडीची धडक लागली. अपघातात एसटी ड्रायव्हर आणि कंडक्टरसह इतर तेरा प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना ॲम्ब्युलन्सचे पायलट सुमित तेलंग हे उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय केज येथे हलविले आहे.



तसेच या अपघाताची माहिती जय जोगदंड यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जखमींना उपजिल्हा रुग्णालयात पोहोचविण्यासाठी मदत केली. त्याच बरोबर पोलिस हेडकॉन्स्टेबल राजू वंजारे यांनी अपघातग्रस्तांना तातडीने मदतीसाठी प्रयत्न केले.

दरम्यान सर्व जखमींवर केज येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार करून त्यांना संदर्भात सेवेसाठी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथे सुमित तेलंग यांच्या ॲम्ब्युलन्स मधून हलविण्यात येत आहे. दरम्यान अपघातस्थळी पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांनी भेट दिली.

जखमींची नावे :- १) ड्रायव्हर आनंद गायके, वय ४० वर्ष, २)कंडक्टर विष्णू तांबडे वय (४२ वर्ष) आणि प्रवासी ३) संजय खरात वय (३५ वर्ष), ४) चैतन संजय खरात, वय (१६ वर्ष), ५)भास्कर गायकवाड, वय (३६ वर्ष), ६)आशा खरात, वय (२५ वर्ष), ७) सचिन खरात, वय (३० वर्ष), ८)रोशनी खरात, वय (१८ वर्ष), ९) भाग्यश्री गायकवाड, वय (३० वर्ष), १०) पायल गायकवाड, वय (१५ वर्ष) आणि ११) सुनिता खरात, वय (३२ वर्ष), १२) सचिन सुरवसे, वय (४५ वर्ष), १३) वैशाली राऊत वय (३२ वर्ष).

## विवेकवादी विचाराचा प्रबोधनात्मक कीर्तन महोत्सव -किरण माने

### संतांची सर्वधर्मसमभाव शिकवण गरजेची : डॉ.कराड

तभा वृत्तसेवा

**परळी |** वर्चस्ववादी विचाराने वैदिकांनी धर्माच्या नावावर समाजात पसरवलेली गुलामगिरी मोडीत काढणाऱ्या जगतगुरू तुकोबारायांच्या गाथा बुडविल्या, त्यांचे चारित्र्य विकृत पद्धतीने प्रसारमाध्यमातून समोर आणत प्रतिमा मलिन केली जात असताना संतांचे विवेकनिष्ठ विचार तळागळाला नेण्याचे काम हे कीर्तन महोत्सव करत असल्याचे प्रतिपादन विवेकवादी वक्ते तथा सिने अभिनेते किरण माने यांनी केले तर "एक नारायण सर्वत्र दिसे भेदाभेद न मानावे" अशी सर्वधर्म समभावाची संत तुकोबारायांच्या शिकवणीची आज समाजाला खऱ्या अर्थाने गरज असल्याचे डॉ.डी.एल.कराड यांनी सांगितले. जगतगुरू संत तुकाराम महाराज बीजे निमित्ताने आयोजित गाव समूहाच्या शेतकरी कीर्तन महोत्सवाचे उदघाटन संतसाहित्य अभ्यासक तथा सिने अभिनेते किरण माने, कामगारांचे राष्ट्रीय नेते डॉ.डी. एल.कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दि २८ रोजी कान्नापूर येथे संपन्न झाले. किरण माने यांनी सांगितले की, समाजात वर्चस्ववादी विचार रुजविण्यासाठी काही शक्ती प्रयत्नशील आहे.

## पावनधाम येथे संत तुकाराम महाराज बीज सोहळा संपन्न

तभा वृत्तसेवा

**केज प्रतिनिधी |** श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पावनधाम संस्थानचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन यावेळी पार पडले.

तुकोबा, विठोबा आणि ज्ञानोबा यांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. परिसरातील अनेक गावच्या पालख्या या ठिकाणी दाखल झाल्या होत्या. पंचक्रोशीसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने भक्त समुदाय श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावन धाम येथे दर्शनासाठी दाखल झाला होता.

अल्पावधीतच "प्रति देहू" म्हणून ओळख निर्माण केलेले हे पावनधाम भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. यावेळी बोलताना ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री म्हणाले की, "पावनधाम संस्थान हे सर्वांचे आहे. संत तुकाराम महाराजांच्या विचारांवर चालणारी ही संस्था आज सर्वांच्या श्रद्धेचे स्थान बनली आहे. ज्या भाविकांना देहू येथे जाता येत नाही, अशा भाविकांना येथे साक्षात तुकोबारायांचे दर्शन घेण्याची संधी मिळते."

या कार्यक्रमानिमित्त उद्योजक नामदेव इंदरराव गोरे यांनी

## संतकवी दासोपंत समाधी परिसरातील वाढते गैरप्रकार बंद करून पवित्र वास्तुचे संरक्षण करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** मराठीतील श्रेष्ठ संतकवी पासोडीकार सर्वज्ञ दासोपंत यांची समाधी अंबाजोगाई शहराबाहेर आद्यकवी मुकुंदराज समाधी रस्त्यालगत असून या समाधी परिसरात मद्यप्राशन,अस्वच्छता, तोडफोड व नासधूस यांसारखे गैरप्रकार सारखेच घडत असल्याने या पवित्र स्थळाची हानी होत आहे. हे होत असलेले गैरप्रकार रोखून या भागाचे संरक्षण तसेच वीजेची व्यवस्था करावी या मागणीचे निवेदन दासोपंत संशोधन मंडळ,श्री दत्त संस्थान धाकटे देवघर व शहरातील भक्त भाविकांच्या वतीने गुरुवार ५ मार्च रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, संतकवी सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरात परिसरात प्रकाश योजना नाही त्यामुळे गैर प्रकारांना वाव मिळत आहे.



स्थानिक प्रशासनाने स्वच्छता व देखभाल करावी, सर्वज्ञ दासोपंत समाधी स्थळ हे पवित्र स्थान असल्यामुळे त्याचे जतन व संरक्षण करावे त्याच बरोबर जवळच असलेल्या नृसिंह तीर्थ स्मशानभुमीतही स्वच्छता, संरक्षक भिंत तसेच प्रखर विजेच्या दिव्यांची व्यवस्था करावी. या मागणी निवेदनाच्या प्रती आ.नमिता मुंदडा, अप्पर पोलीस अधीक्षक, बीड, तहसीलदार, अंबाजोगाई, मुख्याधिकारी, नगर परिषद, मा.नगराध्यक्ष, अंबाजोगाई यांना देण्यात आल्या असून निवेदनावर दिगंबर गोस्वामी ॲड.मकरंद पत्की, श्रेयस गोस्वामी, डॉ.प्रज्वल देशपांडे, लक्ष्मीकांत गोस्वामी, अविनाश जोशी, राहूल देशपांडे, डॉ.सुधीर धर्मपात्रे, ए.पी.देशपांडे, पद्माकर कुलकर्णी, मकरंद सोनेसांगवीकर, ॲड.राघवेंद्र, देशपांडे, ॲड.डी.पी.रांदड, प्रतीक पुसरेकर, ॲड.अमर देशपांडे, सुश्रुत पुराणिक, संतोष देशपांडे, कृष्णा सनगावकर, गजानन देशपांडे, शशीकुमार कुर्लेकर, मंगेश गोस्वामी, भास्कर देशपांडे शंतनू परळकर, सुमंत गोस्वामी, अमोघ कुलकर्णी, बालासाहेब मुंडे, श्रीकांत गोस्वामी, महेश आराध्ये, अविनाश अघोर, अभय जोशी, पद्माकर सेलमोकर, सागर दिक्षित, सुमित केजकर, विश्वंभर गोस्वामी आदीसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संजय राठोड मंत्री मृद व जलसंधारण यांचा शनिवारी बीड जिल्हा दौरा

**बीड |** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड बीड जिल्ह्याच्या दोऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

दिनांक ०७ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.०० वा.हेलिकॉप्टरने तीर्थक्षेत्र रामराव महाराज गड हेलिपॅड, काठोडा, तालूका गेवराई, जि. बीड कडे प्रयाण. सकाळी ११.०० वा. तीर्थक्षेत्र रामराव महाराज गड हेलिपॅड येथे आगमन व संत श्री सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती उत्सवानिमित्त बंजारा महामेळावा व भव्य रॅली स्पर्धा आणि बंजारा सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १.३० वा. तीर्थक्षेत्र रामराव महाराज गड येथून हेलिकॉप्टरने जवाहरलाल नेहरू दर्डा हेलिपॅड, भारी, जि यवतमाळ कडे प्रयाण.

## तुलसी समूहाची महिला मॅरेथॉन आता 'सामाजिक न्याय भवन' येथून; रमजान ईदमुळे प्रारंभ स्थळात बदल

तभा वृत्तसेवा

**बीड |** (प्रतिनिधी) | जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'तुलसी शैक्षणिक समूह, बीड' यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार, दि. ८ मार्च रोजी भव्य 'महिला मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी रमजान ईदमुळे वाहतूक आणि नियोजनाच्या सोयीसाठी स्पर्धेच्या प्रारंभ स्थळात बदल करण्यात आला असून, आता ही स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथून सुरू होणार आहे.

आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी ठीक ६:०० वाजता मान्यवरांच्या हस्ते या मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवण्यात येईल. ७ किलोमीटर अंतराची ही स्पर्धा सामाजिक न्याय भवन येथून प्रारंभ होऊन नगर रोडमार्गे पुन्हा त्याच ठिकाणी समारोप होईल. पूर्वीचे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण हे स्थळ बदलून आता 'सामाजिक न्याय भवन' निश्चित करण्यात आले आहे, याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी.

स्पर्धा दोन वयोगटांत विभागण्यात आली आहे. १० ते १८ वर्षे वयोगट आणि १८ वर्षांवरील महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्यांना अनुक्रमे १५,०००, १०,००० व ७,००० अशी रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

सर्व सहभागी स्पर्धकांना आकर्षक टी-शर्ट, नाश्ता व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. लहान गटासाठी ५० तर मोठ्या गटासाठी २०० असे नोंदणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

या भव्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक महिला व विद्यार्थिनींनी शुक्रवार, दि. ६ मार्चपर्यंत आपली नोंदणी पूर्ण करणे बंधनकारक आहे. अधिक माहिती आणि नावनोंदणीसाठी ८७८८५३७३४४ किंवा ८२७५५४२०८२ या क्रमांकावर संपर्क साधावा. महिला शक्तीचा जागर करणाऱ्या या उपक्रमात स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ह.भ.प. भगवान बाबा महाराज पात्रुडकर यांची नर्मदा परिक्रमा पूर्ण

तभा वृत्तसेवा

**माजलगाव (प्रतिनिधी) |** 'नर्मदे हर'च्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि अबालवृद्धांच्या उपस्थितीत पात्रुड गावचे सुपुत्र श्री ह.भ.प. भगवान बाबा महाराज पात्रुडकर यांचे नर्मदा परिक्रमा पूर्ण करून स्वगावी जंगी आगमन झाले. अत्यंत कठीण मानली जाणारी सुमारे साडेतीन हजार किलोमीटरची पायी परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून परतलेल्या महाराजांच्या स्वागतासाठी संपूर्ण पात्रुड परिसरात भक्तीचा पूर लोटला होता.तपस्येची सांगता आणि ग्रामस्थांचा उत्साह



नर्मदा परिक्रमा ही आध्यात्मिक क्षेत्रातील एक मोठी तपस्या मानली जाते. मैयाला उजव्या हाताला ठेवून, अनवाणी पायांनी आणि अत्यंत साध्या राहणीमानाने हा प्रवास करावा लागतो. भगवान बाबा महाराजांनी ही वारी निष्ठेने पूर्ण केली. महाराज गावात येणार ही वार्ता समजताच पात्रुड ग्रामस्थांनी संपूर्ण गावाची स्वच्छता करून रस्ते रांगोळ्यांनी सजवले होते. गावाच्या वेशीवर महाराजांचे आगमन होताच सुवासिनींनी मंगल कलश घेऊन त्यांचे औक्षण केले आणि पुष्पवृष्टी केली.गावातील मुख्य मार्गावरून महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी वारकरी संप्रदायातील भागवत भुजबळ व भजनी मंडळांनी विठ्ठल नामाचा आणि नर्मदा मैयाचा जयघोष करत वातावरण भक्तिमय करून सोडले. ठिकठिकाणी भाविकांनी महाराजांचे पाय धुवून दर्शन घेतले. "आमच्या गावच्या सुपुत्राने एवढे मोठे पुण्यकर्म आणि खडतर प्रवास पूर्ण केला, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे," अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

मिरवणुकीनंतर आयोजित सत्संग सोहळ्यात महाराजांनी आपले अनुभव कथन केले. ते भावूक होऊन म्हणाले,

"नर्मदा परिक्रमा हा केवळ शारीरिक प्रवास नसून तो आत्मिक शुद्धीचा मार्ग आहे. साडेतीन हजार किलोमीटरचा हा प्रवास मैयाची कृपा आणि आपल्या सर्वांच्या आशीर्वादानेच निर्विघ्नपणे पार पडला. निसर्ग आणि मानवी मूल्यांची जपणूक हाच खरा धर्म आहे."


याप्रसंगी पात्रुड गावचे सरपंच पती लतीफ मोमीन, उपसरपंच घनश्याम भुतडा, माजी सरपंच एकनाथ मस्के, बाळासाहेब बनकर, शिवाजी गोमचाळे, महारुद्र जंगले, महावितरण कंपनीचे कर्मचारी पांडुरंग जामकर , नामदेव पोपळघट,गावातील सर्व मान्यवर व नागरिक महिलावर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थिती होते आणि या स्वागत सोहळ्याला परिसरातील अनेक नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर पंचक्रोशीतील बाबाला मानणारा सर्व महिला पुरुषवर्ग मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. महाराजांच्या स्वागतानिमित्त पात्रुडमध्ये महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे गावात दिवाळीसारखा सण साजरा होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचा परळीत प्रारंभ

तभा वृत्तसेवा

**परळी |** महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचा पहिला टप्पा परळी तालुक्यात शनिवार, ७ मार्च रोजी सकाळी १० वाजता सीरसाळा येथे सुरू होणार आहे. या अभियानांतर्गत तालुक्यातील विविध सर्कलमध्ये १५ मेपर्यंत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार असून, नागरिकांच्या महसूल व विविध शासकीय कामांचा तातडीने निपटारा करण्यात येणार आहे. अशी माहिती परळीचे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी दिली.

या अभियानात परळी, सीरसाळा, नागापूर, गाढे पिंपळगाव, धर्मापुरी आदी सर्कलमध्ये शिबिरे घेण्यात येणार असून त्यासाठीच्या तारखा लवकरच निश्चित केल्या जाणार आहेत.



शिबिरांमध्ये शालेय विद्यार्थ्यांना विविध दाखले वाटप, मंजूर झालेल्या रस्ते आदेशांची सातबाऱ्यावर नोंद, तसेच प्रलंबित फेरफार प्रकरणे शिबिरस्थळीच पूर्ण करण्यात येणार आहेत. याशिवाय संजय गांधी निराधार योजना व इतर निराधार योजनांचे प्रलंबित अर्ज तपासून त्यांचा निपटारा केला जाणार आहे. तसेच नागरिकांना सातबारा व ८-अ उतारे वाटप, आयुष्मान कार्ड वाटप प्रक्रिया, आधार कार्ड अपडेट, विद्यार्थ्यांना एसटी पास योजनेची माहिती, तसेच पानंद रस्त्यांशी संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठीही प्रयत्न केले जाणार आहेत. या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन परळीचे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी केले आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

# हिंगोली लोकसभा मतदारसंघातील रेल्वे सुविधांसाठी रेल्वेमंत्र्यांकडे साकडे

## खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी घेतील रेल्वेमंत्र्यांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**



हिंगोली मतदारसंघासह मराठवाडा व विदर्भातील प्रवाशांना अधिक चांगल्या रेल्वे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना भेटून विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे कडून देण्यात आले आहे. या निवेदनामध्ये अनेक महत्त्वाच्या रेल्वे गाड्या दररोज सुरू करणे, नवीन रेल्वे सेवा सुरू करणे तसेच काही प्रलंबित रेल्वे प्रकल्पांना गती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की कोल्हापूर–नागपूर एक्सप्रेस ११४०३/११४०४ ही रेल्वे सध्या आठवड्यातून केवळ दोन दिवस धावत असून ती दररोज चालविण्याची आवश्यकता आहे. ही रेल्वे कोल्हापूर–सांगली–मिरज–कुर्डवाडी–सोलापूर–लातूर–परभणी–नांदेड़–अकोला–अमरावती मार्गे नागपूरपर्यंत धावत असल्याने पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या तीनही भागांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. ही गाडी दररोज सुरू झाल्यास प्रवासी, व्यापारी, विद्यार्थी तसेच रुग्णांना मोठी सुविधा मिळेल.

विशेषतः पंढरपूर येथे भगवान विठ्ठलाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून हजारो भाविक येत असतात. आषाढी व कार्तिकी एकादशीसह वर्षभर धार्मिक पर्यटन सुरू असते. त्यामुळे कोल्हापूर–नागपूर ही रेल्वे दररोज सुरू केल्यास भाविकांना मोठी सोय होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय रेल्वे मंत्रालयाने २९ ऑगस्ट २०२३ रोजी मंजुरी दिलेली नांदेड–कुर्ला (मार्गे हिंगोली–पूर्णा– वाशिम–अकोला) ही नवीन रेल्वे अद्याप सुरू करण्यात आलेली नाही. या रेल्वेला स्वतंत्र व कायम स्वरूपी रॅक देऊन तात्काळ नियमित सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. ही रेल्वे सुरू झाल्यास हिंगोली, वाशिम, पूर्णा, अकोला तसेच आसपासच्या ग्रामीण भागातील नागरिकांना मुंबईशी थेट रेल्वे संपर्क उपलब्ध होणार असून विद्यार्थी, नोकरी करणारे नागरिक, व्यापारी तसेच रुग्णांना मोठी सुविधा मिळणार आहे.

तसेच नांदेड़–श्रीगंगानगर रेल्वे सेवा दररोज चालवावी, नांदेड़–जम्मूतवी हमसफर एक्सप्रेसचा विस्तार करून ती श्री माता वैष्णोदेवी कटरा पर्यंत चालवावी आणि हिंगोली मार्गे अयोध्याधाम, हरिद्वार, जैसलमेर व फाजिल्का या ठिकाणांसाठी नवीन सुपरफास्ट रेल्वे सेवा सुरू कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याबरोबरच अमरावती–तिरुपती रेल्वे सेवा दररोज चालविणे, अकोला–ढोन दरम्यान डबल लाईनचे काम तातडीने सुरू करणे, तसेच काही गाड्यांमधील अनावश्यक विलंब (लूज टाइम) कमी करून प्रवाशांना वेळेत सेवा देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

या सर्व मागण्या पूर्ण झाल्यास हिंगोली मतदार संघासह मराठवाडा व विदर्भातील रेल्वे प्रवाशांना मोठी सुविधा मिळेल. तसेच धार्मिक पर्यटन, व्यापार, उद्योग व क्षेत्राच्या एकूण विकासाला मोठी चालना मिळेल, असे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे..

हिंगोली जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी पुणे येथे शिक्षण व नोकरीसाठी आहेत. पुणे मुंबईसाठी हिंगोलीहून थेट रेल्वे नसल्यामुळे अनेकांना परभणी किंवा नांदेड येथून जावे लागते. मुंबई, पुणेसाठी विशेष रेल्वे सुरू केल्यास त्याचाही मोठा फायदा रेल्वे विभागाला होणार आहे. विद्यार्थी तसेच पालकांचा मोठा प्रश्न मार्गी लागणार आहे.

# २८ हजारांची लाच घेतांना मुख्याध्यापकास अँटी करप्शनने घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**



औंढा नागनाथ तालुक्यातील मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापकास शाळेतील शिक्षकाकडून २८ हजार रूपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार औंढा नागनाथ तालुक्यातील मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एका शिक्षकाला संपूर्ण वर्षाचा घरभाडे भत्ता पोटी ५८ हजार रूपयांची रक्कम मिळाली होती. मात्र सदर रकमेतून ५० टक्के रक्कम दे असा मुख्याध्यापक संतोष कढणे याने संबंधित शिक्षकाकडे तगादा लावला होता. सदर रक्कम न दिल्यास मुख्यालयी राहत नसल्याचा अहवाल शिक्षण विभागाकडे पाठविण्याची धमकीही देण्यात आली होती. त्यानंतर तडजोड होऊन २८ हजार रूपये देण्याचे ठरले होते.

दरम्यान, या प्रकरणात शिक्षकाने हिंगोलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार दि ५ मार्च रोजी दुपारी खटकाळी बायपास येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अत्यंत हुशारीने सापळा रचला. मुख्याध्यापक कढणे याने संबंधित शिक्षकाकडून २८ हजार रूपयांची लाच घेताच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यास रंगेहाथ पकडले. सदरील सापळा लाचलुचपतचे उपाधिक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सुलभा राऊत, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शेख युनूस, जमादार भगवान मंडलीक, रवींद्र रवणे, राजाराम फुपाटे, शिवाजी वाघ, शेख अकबर, विनोद पुंडगे, महिला पोलिस कर्मचारी योगिता अवचार यांच्या पथकाने केली आहे. याप्रकरणी लाचलुचपतचे निरीक्षक राजेश मलपिल्लु यांच्या तक्रारीवरून हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्याध्यापक याच्या वाशिम येथील घरी वाशिम पोलिसांचे पथक घराची झडती घेण्यासाठी गेले होते.

# विवाहीतेस लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार, तरूणाविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**

गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात विवाहीतेस लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार करणाऱ्या तरूणाविरूध्द गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिसांनी तरूणास दि ६ मार्च रोजी ताब्यात घेतले आहे. त्याची सखोल चौकशी पोलिस करीत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका गावातील विवाहीत महिला कामावर जात असतांना गणेश पायघन वय २१ या तरूणाने तिच्याशी मैत्री केली. त्यातून तिच्यासोबत गणेशने प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर त्याने तुझ्या कुटुंबाला सोडून दे मी तुझा सांभाळ करतो व लग्न करतो असे आमिष दाखविले.

दरम्यान, सदर विवाहीत महिला तिच्या माहेरी आली असतांना गणेश देखील तिच्या माहेरी आला होता. यावेळी त्याने विवाहीतेवर अत्याचार केला. त्यानंतर त्या विवाहीतेने लग्न करण्यासाठी तगादा लावला असतांना गणेश याने लग्न करण्यास नकार देऊन तिला टाळू लागला होता. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्या महिलेने सदर प्रकार तिच्या माहेरच्या मंडळींना सांगितला. त्यानंतर तिने दि ५ मार्च रोजी गोरेगाव पोलिसांत तक्रार दाखल केली.या तक्रारीवरून पोलिसांनी गणेश पायघन याच्याविरूध्द अत्याचार केल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून गोरेगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद झळके, उपनिरीक्षक नितेश लेनगुळे, जमादार अनिल भारती यांच्या पथकाने तातडीने त्या गावात जाऊन तरूणाचा शोध सुरू केला. दि ६ मार्च रोजी पहाटे पथकाने गणेश पायघन यास ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलिसांनी अधिक चौकशी सुरू केली आहे. उपनिरीक्षक लेनगुळे हे पुढील तपास करीत आहेत.

# वसमत येथे महिलांसाठी स्टीक आत्मसंरक्षण शिबीराचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ६ मार्च**



महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी आणि महिलांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी 'आत्मरक्षा अँड ऑल कराटे मार्शल आर्ट स्पोर्ट' तर्फे एक स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वसमत येथील श्री संत शिरोमणी माऊली महाराज मंदिर येथे ७ दिवसीय मोफत 'स्टिक' (काठी) आत्मसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आजच्या युगात महिलांना स्वसंरक्षणाची कला अवगत असणे अत्यंत गरजेचे आहे. या भावनेतून मास्टर सोमनाथ हेगू यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर राबविण्यात येत आहे. या शिबिरामध्ये मुलींना आणि महिलांना संकटाच्या वेळी स्वतःचा बचाव कसा करावा, विशेषतः 'स्टिक'चा (काठीचा) प्रभावी वापर करून प्रतिस्पर्ध्याला कसे रोखावे, याचे सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. या सात दिवसीय शिबिरात अनुभवी प्रशिक्षकांकडून बारकावे शिकवले जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने मास्टर सीमा पाठक, आकांक्षा दवणे, सोमनाथ हेगू, संभाजी कुसळे सर्व प्रशिक्षक महिलांना प्रतिकार करण्याचे विविध तंत्र आणि कौशल्ये शिकवत आहेत. शिबिराच्या पहिल्या दिवसापासूनच वसमत शहरातील महिला आणि विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. माऊली महाराज मंदिराच्या पवित्र परिसरात सुरू असलेल्या या उपक्रमाचे शहरवासीयांकडून कौतुक होत आहे. हे शिबिर पूर्णपणे मोफत असल्याने जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.


## संक्षिप्त वृत्त

### जागतिक दिनानिमित्त महिलांचे आरोग्य शिबीर



औंढा नागनाथ– तालुक्यातील शिरडशहापूर येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ६ मार्च रोजी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ग्रामपंचायत सदस्य व सामाजिक कार्यकर्त्या नाजेमा सय्यद यांच्या पुढाकाराने महिलांसाठी आरोग्य शिबीर घेण्यात आले. यावेळी महिलांची बीपी, शुगर, थायरॉईड यांची तपासणी करून त्यावर उपचार करण्यात आले तसेच मार्गदर्शन करण्यात आले. औषध, गोळ्या आणि ग्लुकोज पावडरचे वाटप करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. आकाश महाजन, डॉ. उल्हास मेश्राम, डॉ. वृषाली आमटे, डॉ. सय्यद सबाकशीष, अरविंद खूपसे, ए.बी.पोटे, भारती शिंदे, अंजली आकमार, स्वाती कांबळे यांच्यासह आरोग्य विभागातील कर्मचारी आणि महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

### श्रीमद् भागवत कथानिमित्त ८ मार्चला शोभायात्रा



हिंगोली– १९ मार्च गुरुवार पासून हिंगोली शहरात श्रीमद भागवत कथेचे आयोजन सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय कथाकार बंधू श्री रमेश भाई आझा यांच्या सुमधुर आवाजात करण्यात आले आहे. श्रीमद भागवत कथेचे आयोजन स्थल शहरातील रामलीला येथे भव्य मंडप म्हणजेच पंडाल बांधण्यात येत आहे. या मंडपातील स्तंभ रोहन म्हणजेच बांसचे पूजन करण्याचा कार्यक्रम रविवार ८ मार्च रोजी दुपारी आयोजित करण्यात आला आहे. बांस पूजनासाठी हिंगोली शहरात भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. रविवार ८ मार्च रोजी दुपारी ३:३० वाजता शहरातील पोस्ट ऑफिस रोडवरील श्री बद्रीनाथ मंदिरापासून ध्वज मिरवणूक निघेल. ही मिरवणूक शहरातील गांधी चौक, इंदिरा गांधी चौक मार्गे रामलीला मैदान येथे पोहोचेल. जिथे वैदिक मंत्रोच्चारात स्तंभाची पूजा केली जाईल. कथेच्या बांबू पूजनाच्या कार्यक्रमासाठी मिरवणुकीत महिला व पुरुष भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे तसेच रविवारी दुपारी साडेतीन वाजता पोस्ट ऑफिस रोडवरील श्री बद्रीनाथ मंदिरापासून ही मिरवणूक निघेल, अशी माहिती मुख्य संयोजक श्री गजराज बाल गणेश मंडळाने दिली आहे.

### ९१ वाहन चालकांविरूध्द कारवाई

हिंगोली–अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९१ वाहन चालकाविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून ७४५०० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची चित्ररथाद्वारे जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**



जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५–२०२६ अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून विविध विभागाच्या कल्याणकारी विविध योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

आज हिंगोली जिल्ह्यातील डोंगरकडा, कहाकर (बु.), केंद्रा बु., गुगुळ पिंपरी, कडोळी, गोरेगाव, आखाडा बाळापूर, शेवाळा, येलकी, घोडा, येहळेगाव तु., सावना, बाभुळगाव, चिंचा, दांडेगाव, पारडी, पुसेगाव, खुडज, हत्ता आदी गावामध्ये चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून विविध विभागाच्या कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यात आली. या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ८ मार्चला अस्मिता महिला लीग स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाकडून प्राप्त सूचनांनुसार आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'अस्मिता महिला लीग' आयोजनाबाबत मानक कार्यपद्धती निर्गमित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यात भारतीय क्रीडा प्राधिकरण, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली, खेलो इंडिया, माय भारत, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तालुका क्रीडा संकुल हिंगोली यांच्या सहकार्याने दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता तालुका क्रीडा मैदान, हिंगोली येथे 'अस्मिता महिला लीग' स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

महिला खेळाडूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, क्रीडा सहभाग वाढविणे, स्थानिक स्तरावर क्रीडा चळवळ बळकट करणे तसेच आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरणाचा संदेश देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. तसेच जिल्हा स्तरावर क्रीडा संरचना व तांत्रिक क्षमता विकसित करण्यावरही भर देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत अॅथलेटिक्स प्रकारातील धावण्याच्या स्पर्धांचा समावेश असून १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. स्पर्धा १३ वर्षाखालील, १३ ते १८ वर्षे व १८ वर्षांवरील मुली व महिलांसाठी खुल्या राहतील.

नोंदणीच्या वेळी खेळाडूंच्या वयाची पडताळणी आधार कार्ड (प्राधान्याने), राज्य किंवा केंद्र शासनाने दिलेला जन्मतारीख नमूद असलेला पुरावा, दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र आदी कागदपत्रांच्या आधारे करण्यात येणार आहे. तसेच नोंदणीदरम्यान खेळाडूंचे वय, वजन व उंची नोंदविणे आवश्यक राहील. हिंगोली जिल्ह्यातील इच्छुक मुली व महिला खेळाडूंनी दि. ७ मार्च २०२६ पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह संकेतस्थळावर नोंदणी करणे बंधनकारक आहे. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पदक देऊन गौरविण्यात येणार आहे.

# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव अभियान एक एप्रिलपासून राबविणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**



राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम, रोगमुक्त व स्वयंपूर्ण करण्याच्या दिशेने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या महत्वाकांक्षी माझं गाव, आरोग्य संपन्न गाव या अभियानास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. हिंगोली जिल्ह्यात लोकसहभागावर आधारित माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव ही राज्यव्यापी आरोग्य चळवळ राबविण्यास १ एप्रिल पासून ३१ मार्चपर्यंत हे अभियान राबविण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा परिषद येथील व्हिडिओ कॉन्फरन्स सभागृहात सर्व गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांची बैठक घेऊन अभियानाची दिशा ठरविण्यात आली.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) समृद्धी दिवाणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गडापोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, गट विकास अधिकारी माया वानखडे, अनिल मुंढे, प्रफुल्ल तोटेवाड, सुरेश कांबळे, कार्यकारी अभियंता श्री. नरवाडे यांच्यासह सर्व विस्तार अधिकारी व तसेच जिल्ह्यातील ग्रामसेवक हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.

गाव पातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना देण्यासाठी, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत बदल, व आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरणार असून, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन यासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनवणे हा या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गायकवाड यांनी सांगितले

या अभियानांतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊ नयेत, यावर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता–बाल आरोग्य सुधारणे, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन, जीवनशैलीजन्य आजारांचे नियंत्रण आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापना केल्या जाणार आहेत. आरोग्यमंत्री श्री. आबीटकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती असून, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, आयुक्त व संचालक या समितीचे सदस्य असतील. राज्यस्तरीय कृती समितीही स्थापन करण्यात येणार असून, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव (अपर मुख्य सचिव) समितीचे अध्यक्ष असतील. आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून घोषित करण्यात येईल. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव ही योजना म्हणजे केवळ आरोग्य विभागाची नव्हे, तर समाजाच्या सर्व घटकांच्या सहभागातून उभी राहणारी लोकचळवळ ठरणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळणार असून, आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पनेला बळकटी मिळणार आहे.

# चतुर्थीनिमित्त श्री चिंतामणी गणपतीला गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**

नवसाला पावणारा श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनाला आज चतुर्थीनिमित्त भाविकांनी सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. शहरातील गड्डीपरी गल्लीतील श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील भाविक सकाळपासूनच रांगेत दर्शनासाठी उभे ठाकले होते. यावेळी मंदिर प्रशासनाच्यावतीने दर्शनासाठी चोख व्यवस्था करण्यात आली होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कुसुम सभागृहात उद्या भारत-न्यूझीलंड अंतिम लढत मोठ्या पडद्यावर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ मार्च-**

शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतीय संघाने इंग्लंडचा पराभव करून दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या पार्श्वभूमीवर क्रिकेटप्रेमींना अंतिम सामन्याचा थरार एकत्र अनुभवता यावा यासाठी भाजप नांदेड महानगरतर्फे रविवार दि. ८ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता कुसुम सभागृह, व्हीआयपी रोड, नांदेड येथे भारत विरुद्ध न्यूझीलंड हा अंतिम सामना मोठ्या पडद्यावर मोफत दाखविण्यात येणार असल्याची माहिती महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर व जिल्हा सरचिटणीस धर्मभूषण अॅड. दिलीप ठाकूर यांनी दिली आहे.

प्रत्येक क्रिकेटप्रेमीची इच्छा स्टेडियममध्ये जाऊन सामना पाहण्याची असते. मात्र वेळेअभावी तसेच प्रचंड तिकीट दरांमुळे अनेकांना प्रत्यक्ष स्टेडियममध्ये जाऊन सामना पाहणे शक्य होत नाही. अशा वेळी भरगच्च सभागृहात मोठ्या पडद्यावर सामना पाहताना स्टेडियममध्ये सामना पाहण्यासारखाच थरार आणि उत्साह अनुभवायला मिळतो. याच उद्देशाने नांदेडमधील क्रीडारसिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमाला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित




गोपछडे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कोडगे व ड. चैतन्यबापू देशमुख, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे तसेच ड. किशोर देशमुख,महापौर कविता मुळे, उपमहापौर दिपकसिंह रावत,सभागृह नेते ड. महेश कनकदंडे,डॉ. सचिन उमरेकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

यंदाच्या ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपांत्य फेरीत इंग्लंडवर मात केली आणि अंतिम फेरीत धडक मारली. विशेष म्हणजे २० षटकांच्या विश्वचषकाच्या इतिहासात आतापर्यंत कोणताही यजमान संघ अंतिम फेरीत पोहोचला नव्हता. भारतीय संघाने ही ऐतिहासिक कामगिरी करत देशातील क्रिकेटप्रेमींमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला आहे. तसेच सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याची आणि यजमान संघ म्हणून विश्वचषक जिंकण्याची संधी प्रथमच भारताला मिळत असल्यामुळे अंतिम सामन्याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

क्रिकेटप्रेमींना एकत्र येऊन या सामन्याचा आनंद लुटता यावा, यासाठी मोठ्या पडद्यावर सामन्याचे प्रक्षेपण करण्याची परंपरा धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांनी अनेक वर्षांपासून जपली आहे. १९९५ पासून ट्वेंटी-२० तसेच ५० षटकांच्या विश्वचषक स्पर्धांतील सामने शहरात मोठ्या पडद्यावर दाखवण्याचा उपक्रम त्यांनी सातत्याने राबविला असून मोठ्या पडद्यावर सामना दाखवण्याची ही १८ वी वेळ ठरणार आहे. भारताच्या विजयाच्या वेळी क्रीडारसिकांचा उत्स्फूर्त जल्लोष आणि देशभक्तीचा माहोल निर्माण होणे ही या कार्यक्रमाची खासियत ठरते.

रविवारी होणाऱ्या या रोमांचक अंतिम सामन्याचे प्रक्षेपण यशस्वी करण्यासाठी सुरेश लोट, कामाजी सरोदे, सुरेश शर्मा, अरुणकुमार काबरा, संतोष भारती, राजेशसिंह ठाकूर, सुरेश निलावार, जगतसिंग ठाकूर व शिवा लोट हे परिश्रम घेत आहेत. कुसुम सभागृहात मर्यादित आसनव्यवस्था असल्याने जे प्रथम येतील त्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

भारताच्या विजयी अभियानाचा थरार मोठ्या पडद्यावर अनुभवण्यासाठी नांदेड शहरातील क्रीडारसिकांनी मोठ्या संख्येने वेळेवर कुसुम सभागृहात उपस्थित राहावे, असे आवाहन माजी आमदार अमरनाथ राजूरकर व धर्मभूषण अॅड. दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

# मच्छिमारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक; अतिवृष्टीची नुकसान भरपाई महिनाभरात मिळणार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ६ मार्च-**

महाराष्ट्र राज्यातील मच्छिमार बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत राज्य शासन अत्यंत सकारात्मक असून, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई येत्या एका महिन्यात मच्छिमारांना दिली जाईल, असे आश्वासन राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री ना. श्री. नितेश राणे यांनी दिले आहे. मुंबई येथील मंत्रालयात बुधवार, ४ मार्च २०२६ रोजी आयोजित एका विशेष बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीला मत्स्यव्यवसाय आयुक्त विजय सूर्यवंशी, मत्स्यव्यवसाय उपायुक्त देवरे,



दीक्षित मॅडम आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा भाजपा मच्छिमार सेलचे जिल्हा संयोजक तथा महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघाचे संचालक तुकाराम वानखेडे यांच्यासह मराठवाड्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

बैठकीत मच्छिमारांनी गोदावरी व कृष्णा खोऱ्यातील मासेमारी व पाणी वाटपाशी संबंधित समस्यांबाबत सविस्तर निवेदन दिले. या विषयावर सकारात्मक चर्चा झाली असून, संबंधित विभागांशी शासन स्तरावर पत्रव्यवहार सुरू आहे. हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी आगामी विधानसभा अधिवेशनात यावर विशेष चर्चा केली जाईल, असे नामदार राणे यांनी स्पष्ट केले.अतिवृष्टीमुळे मच्छिमार बांधवांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. या नुकसानीची भरपाई पुढील एका महिन्याच्या आत मच्छिमारांच्या खात्यावर जमा केली जाईल, असे आश्वासन मंत्री महोदय व उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले. यामुळे नुकसानग्रस्त मच्छिमारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मच्छिमारांच्या हितासाठी १२ मे २०२३ रोजीच्या शासन निर्णयाला स्थगिती आदेश कायम ठेवल्याबद्दल मच्छिमार बांधवांनी समाधान व्यक्त केले. या निर्णयाबद्दल मंत्री महोदयांचे आभार मानण्यासाठी आणि मच्छिमारांच्या अन्य स्थानिक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे लवकरच एक मोठी बैठक आयोजित केली जाणार आहे. या बैठकीसाठी स्वतः मंत्री महोदय उपस्थित राहणार असून त्यांनी लवकरच तारीख देण्याचे मान्य केले आहे.

यावेळी मच्छिमारांच्या समस्या आस्थेने सोडवल्याबद्दल तुकाराम वानखेडे, रत्नाकर मेंढरे, पांडुरंग गल्लापवाड, देवराव वाघाडे, नंदू राठोड व कैलास वीर यांनी शाल व पुष्पहार देऊन नामदार नितेश राणे यांचा भव्य सत्कार केला.

# प्रशासकीय पारदर्शकतेसाठी बिलोलीत 'महाराजस्व अभियान'

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ६ मार्च-**

'महसूल सेवा आपल्या दारी, लोकाभिमुख प्रशासनाची भरारी' हे ब्रीदवाक्य सार्थ ठरविण्यासाठी महसूल प्रशासनाला अधिक गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाती नहाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत' किलोली तहसील कार्यालयाच्या वतीने 'समाधान शिबिर' टप्पा १ चे आयोजन करण्यात आले आहे, या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रलंबित अरमांचा निपटारा जागच्या जागी करण्यात येणार असून, या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन उपविभागीय महसूल अधिकारी क्रांती डोंबे यांनी केले आहे.



प्रलंबित प्रश्न सुटणार, महसूल प्रशासन येणार आपल्या दारी नागरिकांना सात-बारा दुरूस्ती, फेरफार नींदी आणि विविध प्रमाणपत्रांसाठी शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवाचे लागू नये, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. 'पारदर्शक आणि लोकाभिमुख महसूल प्रशासन' हे ब्रीद घेऊन दि. ७ मार्च ते १५ मे या कालावधीत उपविभागीय महसूल अधिकारी होती डोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ७ मार्चपासून तालुक्यातील सहा प्रमुख महसूल मंडळांमध्ये हे शिबिर पार पडणार असून, प्रशासनाने त्याचे सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे, ज्यामध्ये दि, ७ मार्च रोजी सगरोळी, दि. १४ मार्च रामतीर्थ, १० एप्रिल आदमपूर, १७ एप्रिल लोहगाव, ८ में बिलोली मंडळ नगर परिषद, १५ मे रोजी कुंडलवाडी मंडळ व नगर परिषद महसूल मंडळांमध्ये हे शिबिर आयोजित केले जाणार आहे.

या अभियानाचा प्रमुख उद्देश महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन तक्रारीचे एकाच ठिकाणी तात्काळ निवारण करणे, डिजिटल ७/१२, ८अ उतारे आणि 'सिंगल डे सक्षिस डिलिव्हरी' प्रणालीचा प्रभावी वापर करणे, फेरफार अदालतीच्या माध्यमातून जुने प्रलंबित प्रश्न निकाली काढणे,

**एकाच छताखाली मिळणार 'या' सेवा शिबिरात उत्पन्न दाखले,**

रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र आणि नॉन-क्रीमी लेअर प्रमाणपत्रे वितरित केली जातील, तसेच प्रलंबित फेरफार निकालाराड डिजिटल ७/१२ व ८अ उतारे वितरणाची सोय करण्यात आली आहे. 'सिंगल विंडी' (एक खिडकी) प्रणालीमुळे अर्जाची पडताळणी आणि सेवा वितरण जलद गतीने होणार आहे. संभर टक्के प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यावर या अभियानाचा मुख्य भर असून, तहसीलदार व नायस तहसीलदार यांच्या देखरेखीखाली सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. तरी विलोली तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या जनहितार्थ उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राजर्षी शाहू विद्यालयाचे यश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ मार्च-**

केंद्र शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता आठवी एन.एम.एम. एस. परीक्षेत नांदेड येथील राजर्षी शाहू विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले असून विद्यालयाचे २० विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेत कु. प्रतीक्षा विजयकुमार मोकलीकर आणि दिनेश साहेबराव भस्के यांनी शाळेतून प्रथम क्रमांक, कु. वेदिका रामराव भुसारे हीने द्वितीय क्रमांक तर मयुरेश गणेश केंद्रे याने तृतीय क्रमांक पटकाविला.

तसेच इतर उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये पद्मश्री साहेबराव लोहगावे, साईनाथ गोपाळ वडजे, साक्षी दीपक शिरफुले, रामेश्वर बालाजी कानगुले, धनराज चंद्रभान जगताप आदींचा समावेश आहे.




## इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा यशस्वी

**नवीन नांदेड** -विष्णुपुरी सहयोग कॅम्पस नांदेड येथील इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीच्या बी.फार्म तृतीय वर्षाच्या सुमारे ५० विद्यार्थ्यांची २६ फेब्रुवारी २०२६ ते ४ मार्च २०२६ या कालावधीत रोजी शैक्षणिक सहलीला सुरुवात झाली या सहलीदरम्यान २८ फेब्रुवारी २०२६ रोजी कोल्हापूर येथील S G Phyto Pharma Pvt. Ltd. या नामांकित औषधनिर्मिती उद्योगास अभ्यासात्मक भेट घेतली. नांदेड येथील विष्णुपुरी येथील सहयोग कॅम्पस येथील औषध निर्मिती शिक्षण विभागातील विद्यार्थ्यांनी कोल्हापूर येथील औद्योगिक वसाहतीतील कंपनीस भेटी देऊन कंपनीचे युनिट हेड दीपक ए. गुने, प्रॉडक्शन मॅनेजर सागर एस. तारे, अविनाश खटावकर (जनरल मॅनेजर ), सुरेश जगदाळे (सिनियर ऑफिसर) तसेच ज्युनिअर ऑफिसर गणेश सालोखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कंपनीची उत्पादन प्रक्रिया, विविध हर्बल व फाइटो-फार्मा उत्पादने, गुणवत्ता नियंत्रण विभागाचे कार्य, तयार उत्पादनांचे विश्लेषण व मूल्यमापन (परश्रीळी एँीरश्रीरींळेप ेष ऋळपळीहशव झीेंवीलीीं), तसेच उद्योगातील विविध नोकरी संधी व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर माहिती दिली.सहयोग सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांनीही महाविद्यालयीन शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी अशा औद्योगिक भेटी आयोजित करण्यास प्रोत्साहित केले. या शैक्षणिक सहलीत प्राचार्य डॉ. विजय विठ्ठलराव नवघरे यांचा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरला. दरम्यान दौऱ्यात डॉ. पल्लवी कांबळे, माधव डाकोरे, कु. श्रद्धा देशमुख व शुभम जाधव हे प्राध्यापक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सोबत होते.महाविद्यालयाकडून भविष्यातही अशा शैक्षणिक व औद्योगिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

## मुदखेड येथील क्रीडा संकुलला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' नाव द्यावे :चौदंते

**मुदखेड**-मुदखेड येथील सार्वजनिक क्रीडा संकुल स्टेडियमला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, मुदखेड असे अधिकृत नामकरण करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मुदखेड हे तालुक्यातील एक प्रमुख शैक्षणिक व क्रीडा केंद्र असून येथे दररोज हजारो तरुण खेळाडू सरावासाठी येतात तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजनही केले जाते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला केवळ संविधानच दिले नाही, तर शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र देत तरुणांना प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे शिस्त, जिद्द आणि संघर्षाची भावना बळकट होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.मुदखेड येथील क्रीडा संकुलाला डॉ. आंबेडकर यांचे नाव दिल्यास येथील खेळाडूंना व भावी पिढीला प्रेरणा मिळेल व शहरासाठी तो अभिमानाचा विषय ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.या मागण्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे सार्वजनिक क्रीडा संकुलाचे अधिकृत नामकरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, मुदखेड असे करण्यात यावे. नगर परिषदेकडील सर्वसाधारण सभेत नामकरणाचा ठराव मंजूर करण्यात यावा. स्टेडियमच्या मुख्य प्रवेशद्वारावर नामफलक सन्मानपूर्वक लावण्यात यावा. प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून त्वरित कार्यवाही करावी, अशी विनंती निवेदनातून कुणाल देविदासराव चौदंते यांच्या वतीने सादर करण्यात आली असून प्रत माहितीसाठी आमदार श्रीजया चव्हाण, ८५-भोकर मतदारसंघ यांनाही देण्यात आली आहे.



# मुदखेड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांचा कक्ष दोन आठवड्यापासुन कुलूप बंद

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ६ मार्च-**

मुदखेड नगर परिषदेचे मुख्याधिकारी सतत गैरहजर; विकासकामे ठप्प, नागरिकांत संताप

नगर परिषदेचे मुख्याधिकारी गेल्या अनेक दिवसांपासून कार्यालयात सतत गैरहजर राहत असल्याने शहरातील विकासकामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. यामुळे सर्वसामान्यांची कामे रखडली असून, प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

लोकनियुक्त नगराध्यक्षा व मुख्याधिकारी कार्यालयात येत नसल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहेत.

मागील दोन आठवड्यातदि. २५ फेब्रूवारी




रोजी नगर परिषदेत जीबीच्या बैठकीला मुख्याधिकारी यांची उपस्थिती होती. त्यानंतर त्यांच्या कॅबीनिला सतत कुलूपच दिसुन आले.यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

या भागाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते शहरातील अनेक ठिकाणी रस्त्याचे भुमीपुजन झाली आहेत ती विकास कामे काही पुर्ण झाले आहेत तर काही कमे अंतिम टप्प्यात आली आहेत. परंतू ती बोगस कामे होत असल्याची तक्रार नागरिक करित आहेत व त्या कामाची चौकशी करून संबंधीत ठेकेदारावर करवाई करण्यात यावी असे निवेदन देण्यात आले असुन तरी सुद्धा मुख्याधिकारी व इंजिनीयर यांनी त्या बोगस होत असलेल्या कामाकडे फिरकून सुद्धा पाहत नाहीत.मुख्याधिकारी नसल्याने नगर परिषदेच्या इतर कर्मचाऱ्यांवर वचक राहिला नाही, परिणामी कामचुकारपणा वाढला आहे.

नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना रोज फेऱ्या माराव्या लागत आहेत, त्यामुळे नागरीकांमध्ये असंतोष वाढत आहे. सतत गैरहजर असणाऱ्या मुख्याधिकारी यांच्यावर वरिष्ठ संबंधित अधिकारी काय अक्शन घेतील यावर सर्व नागरीकांचे लक्ष लागले आहे.

# नव तेजस्विनी योजनेंतर्गत मदर पोल्ट्री शेडचे उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ मार्च-**

नव तेजस्विनी योजने अंतर्गतच्या मदर पोल्ट्री या उपक्रमांतर्गत संस्था बचत गटातील महिलांचे पोल्ट्री शेड भाड्याने घेण्यात आली आहेत. या शेडमध्ये अंडी उत्पादन, एक दिवसाचे गावरान किंवा सुधारित जातींचे पक्षी ३० दिवसांसाठी संगोपन केले जातात. या कालावधीत पक्षांना पौष्टिक व संतुलित खाद्य दिले जाते व स्वच्छ ताजे पाणी देण्यात येऊन सर्व लसीकरण केले जातात. निरोगी पक्षी बनवले जातात. ३० दिवसानंतर या पक्षांचे संगोपन केल्यानंतर बचत गटातील कुक्कुटपालन करणाऱ्या महिलांना माफक दरात उपलब्ध करून दिले जातात.

बचत गटातील महिलांनी कुक्कट पालन व्यवसाय करावा, या उद्देशाने महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत सावित्री सी.एम.आर.सी. अंतर्गत नव तेजस्विनी योजनेच्या माध्यमातून मदर पोल्ट्री प्रकल्पचे उद्घाटन विष्णुपुरी येथे करण्यात आले.

मदर पोल्ट्री प्रकल्प शेडचे उद्घाटन माविम विभागीय सल्लागार संदीप मराठे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख उपस्थित जिल्हा समन्वय अधिकारी अनंत खेत्रे, व्यवस्थापक राहुल शिंदे उपस्थित होते.

महिलांनी जास्तीत जास्त कुक्कुट पालन व्यवसायाकडे एक शाश्वत व्यवसाय उपजीविका म्हणून पाहावे, जेणेकरून या माध्यमातून महिला यशस्वी आर्थिक सक्षम व व्यावसायिक होतील होतील, असे माविम विभागीय सल्लागार संदीप मराठे यांनी सांगितले.

# छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीराचे लाभ घ्यावा : तहसीलदार सय्यद उमर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ६ मार्च-**

तालुक्यात ७ मार्च ते ८ मे २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान टप्पा १ चे मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील नागरिकांनी या शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहून, आपल्या प्रलंबित कामाचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन तहसीलदार सय्यद उमर यांनी केले आहे.



त्यानुसार हदगाव तालुक्यात ७ मार्च रोजी बरडशेवाळा याठिकाणी सामान्य जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी हदगाव प्रशासनाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान टप्पा १ चे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर ७ मार्च रोजी सकाळी १० वाजता बरडशेवाळा येथे संपन्न होणार आहे. प्रशासकीय पारदर्शकता आणि गतिमानता वाढवण्यासाठी हे शिबिर आयोजित केले आहे.

शासकीय कार्यालयात हेलपाटे न घालता, नागरिकांना त्यांच्या हक्काचे दाखले, कागदपत्रे आणि योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, हा याशिबिराचा मुख्य उद्देश आहे. शासन आपल्यादारी या योजनेला बळकटी देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**शिबिरात उपलब्ध असणाऱ्या प्रमुख सेवा**

विविध दाखले वाटप, ग्रीस्टँक, सातबारा अद्यावत करणे, पी.एम.किसान, प्रलंबित फेरफार निकाली, तुकडेबंदी कायद्याच्या अनुषंगाने कार्यवाही, ई-मोजणी सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ, पाणंद रस्त्याबाबत कार्यवाही, लोकसेवा हक्क कायदा, तात्काळ सेवा, अभिलेख दुरुस्ती, हेल्पडेस्क इतर अनुषंगिक विषय असणार आहेत.

# डिजिटल युगात एडिटिंग कौशल्य ठरते करिअरचे नवे द्वार : पत्रकार मिलिंद वाघमारे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ मार्च-**

डिजिटल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे फोटो, व्हिडिओ व साऊंड एडिटिंग या कौशल्यांना मोठी मागणी निर्माण झाली असून प्रभावी एडिटिंगचे कौशल्य आत्मसात केल्यास करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होतात, असे प्रतिपादन दै. तरुण भारतचे प्रतिनिधी तथा स्त्री अध्ययन केंद्राचे माजी विद्यार्थी मिलिंद वाघमारे यांनी केले.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत स्त्री अध्ययन केंद्र, स्कूल ऑफ सोशल सायन्स आणि जेंडर इक्विटी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दि. ०५ मार्च (गुरुवारी) रोजी आयोजित क्रिएटिव्ह एडिटिंग मास्टरी : कंटेंट क्रिएशन ते प्रोफेशनल करिअर या विषयावरील कार्यक्रमात ते प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. प्रमोद लोणारकर होते, तर कार्यक्रमाचे आयोजन स्त्री अध्ययन केंद्राच्या संचालिका डॉ. शालिनी कदम यांनी केले. यावेळी डॉ. नंदकुमार बोधगिरे, डॉ. बाबुराव जाधव आणि डॉ. सुवर्णा मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाघमारे यांनी प्राचीन काळातील संवाद साधने, पॉम्प्लेट व पुस्तकांचा काळ, त्यानंतरचे वृत्तपत्र, रेडिओ, दूरचित्रवाणी, इलेक्ट्रॉनिक मीडिया, वेबसाईट आणि आजच्या सोशल मीडियापर्यंत संवाद माध्यमांचा झालेला प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितला. यावेळी त्यांनी विविध एडिटिंग सॉफ्टवेअरचे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना एडिटिंगची साधने कशी वापरायची याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

# शहरातील बुद्ध विहारांची रंगरंगोटी करावी ; नगरसेवक साहेबराव गायकवाड यांचे महापौरांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ मार्च-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त प्रभाग क्रमांक ५ मधील सहयोग नगर बुद्ध विहार व हर्ष नगर बुद्ध विहार येथे रंगरंगोटी तसेच दिवाबत्ती दुरुस्तीची कामे तातडीने करण्यात यावीत, अशी मागणी प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते साहेबराव गायकवाड यांनी नांदेड-वाघाळा महानगरपालिकेचे महापौर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त नांदेड शहरातील विविध बुद्ध विहार व समाज मंदिरांमध्ये अभिवादन कार्यक्रम, धम्म कार्यक्रम तसेच सामाजिक व शैक्षणिक उपक्रम मोठ्या उत्साहात आयोजित केले जातात. या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहत असल्यामुळे या पवित्र स्थळांची स्वच्छता, रंगरंगोटी व दिवाबत्ती व्यवस्था योग्य असणे अत्यंत आवश्यक आहे.

विशेषतः प्रभाग क्रमांक ५ मधील सहयोग नगर बुद्ध विहार व हर्ष नगर बुद्ध विहार येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर जयंती कार्यक्रम आयोजित केले जात असल्यामुळे या दोन्ही ठिकाणी महानगरपालिकेमार्फत प्राधान्याने रंगरंगोटी व दिवाबत्ती दुरुस्तीची कामे तात्काळ करण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच नांदेड शहरातील इतर सर्व बुद्ध विहार व समाज मंदिरांमध्येही डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आवश्यक त्या ठिकाणी रंगरंगोटी व दिवाबत्तीची कामे करून नागरिकांना स्वच्छ, सुंदर व प्रकाशमय वातावरण उपलब्ध करून देण्याची विनंतीही गायकवाड यांनी केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही समता, बंधुता व सामाजिक न्यायाचा संदेश देणारा प्रेरणादिन असल्यामुळे महानगरपालिकेमार्फत योग्य व्यवस्था केल्यास जयंती उत्सव अधिक भव्य व प्रेरणादायी स्वरूपात साजरा होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# थोडक्यात...

## लेझर टेक्नॉलॉजीजला ग्रेट प्लेस टू वर्क प्रमाणपत्र प्राप्त

**मुंबई:** लेझर टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, प्रगत लेझर कटिंग, मेटल मार्किंग आणि वेल्डिंग, शीट मेटल फॉर्मिंग आणि ऑटोमेशन सोल्यूशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी, यांना २०२६ साठी ग्रेट प्लेस टू वर्कएँ प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. हा प्रतिष्ठित सन्मान पूर्णपणे सध्याच्या कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायावर आधारित आहे. कर्मचाऱ्यांनी नेतृत्वावरील विश्र्वास, आपल्या कामाबद्दल अभिमान आणि संस्थेशी दृढ नाते असल्याची भावना व्यक्त केली आहे – जे कंपनीच्या पीपल फर्स्ट आणि उच्च कार्यक्षमतेच्या संस्कृतीप्रती बांधिलकीला अधोरेखित करते. ९३% कर्मचाऱ्यांनी लेझर टेक्नॉलॉजीज हे काम करण्यासाठी उत्कृष्ट ठिकाण असल्याचे सांगितले, जे भारतातील टॉप १०० बेंचमार्क कंपन्यांच्या सरासरीपेक्षा लक्षणीय जास्त आहे.

## न्यूरो सर्जन्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. मिलिंद दुनाखे

**छत्रपती संभाजीनगर :** नुकतेच नाशिक येथे झालेल्या १६ व्या न्यूरो सर्जन्स राज्यस्तरीय परिषदेत डॉ. मिलिंद दुनाखे, मेडिकव्हर हॉस्पिटल, यांनी न्यूरो सर्जन्स असोसिएशनच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. डॉ. दुनाखे यांच्या रुपाने मराठवाडा व छत्रपती संभाजीनगरसाठी ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे.महाराष्ट्र व गोवा राज्यातील न्यूरो सर्जन्सच्या कौशल्यविकासासाठी कार्य करणाऱ्या या परिषदेत सुमारे ४५० हून अधिक नामवंत न्यूरो सर्जन्स सहभागी झाले होते. अल्पावधीतच न्यूरो सर्जन्स असोसिएशनने देश-विदेशात आपल्या कार्याची छाप पाडली असून या क्षेत्रात डॉ. दुनाखे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

## भारतीय सिंगल माल्ट्स आता कमकुवत राहिलेले नाहीत

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय सिंगल माल्ट्स शांतपणे जागतिक व्हिस्की प्लेबुक पुन्हा लिहित आहेत आणि यावेळी, ते ते त्यांच्या स्वतःच्या अटींवर करत आहेत. इंडियन माल्ट व्हिस्की असोसिएशन (आयएमडब्ल्यूए) चे महासंचालक मेजर जनरल (डॉ.) राजेश चोप्रा यांच्या मते, भारताची माल्ट व्हिस्कीची कहाणी नवीनतेच्या मूल्यापेक्षा खूप पुढे गेली आहे आणि गंभीर जागतिक स्पर्धेच्या क्षेत्रात पोहोचली आहे.जुलै २०२४ मध्ये स्थापन झालेली आयएमडब्ल्यूएची स्थापना स्पष्ट आदेशासह करण्यात आली: प्रामाणिकपणाचे रक्षण करणे, गुणवत्ता जपणे आणि प्रीमियम जागतिक श्रेणी म्हणून भारतीय सिंगल माल्ट्सचा प्रचार करणे. संरक्षण म्हणजे ग्राहकांचे हित सुरक्षित करणे, जागरूकता निर्माण करणे, चुकीचे सादरीकरण रोखणे आणि रात्रीच्या वेळी उडणाऱ्या ऑपरेटरना रोखणे. संरक्षण जागतिक दर्जाच्या वैशिष्ट्यांवर आणि पारदर्शकतेवर लक्ष केंद्रित करते. आणि प्रमोशन म्हणजे भारतीय माल्ट्सना जागतिक स्तरावर आत्मविश्र्वासाने स्थान देणे, पर्याय म्हणून नाही तर समान दर्जाचे आहे.

## लाइव्हलाँगने आपली उपस्थिती वाढवली

**मुंबई:** भारतातील आघाडीचे विमा आणि एकात्मिक आरोग्य-तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म असलेल्या लाइव्हलाँगने नागपूर येथील एनआयटी कार्यालयातील श्रीराम श्याम टॉवर्स येथे आपली नवीन शाखा उघडण्याची घोषणा केली. यामुळे सुलभ आणि अति-स्थानिक आरोग्यसेवा आणि विमा उपाय प्रदान करण्याची त्यांची वचनबद्धता आणखी दृढ होते. या विस्तारासह, लाइव्हलाँगने प्रमुख शहरी भागात एक मजबूत ऑफलाइन उपस्थिती निर्माण करण्याचे आपले ध्येय पुढे चालू ठेवले आहे, ज्यामुळे त्यांचे समग्र आरोग्यसेवा, कल्याण आणि विमा ऑफर ग्राहक आणि भागीदारांच्या जवळ येतात.

## राजपुताना स्टेनलेस लिमिटेडचा आयपीओ ९ मार्च रोजी उघडणार

**मुंबई:** स्टेनलेस-स्टील उत्पादन क्षेत्रात तीन दशकांहून अधिक अनुभव असलेली आघाडीची कंपनी राजपुताना स्टेनलेस लिमिटेडने अधिकृतपणे त्यांच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ) ची घोषणा केली आहे. या आयपीओद्वारे भांडवली बाजारातून अंदाजे २५४.९८ कोटी रुपये उभारण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

## वापरकर्त्यांमध्ये मोठ्या बदलाचे निदर्शन

**मुंबई:** कट्स इंटरनॅशनलने महाराष्ट्रातील १,००० माजी ऑनलाइन रिअल मनी गेमिंग वापरकर्त्यांमध्ये केलेल्या नव्या सर्वेक्षणात असे आढळले आहे की 'प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग ॲक्ट, २०२५' अंतर्गत ऑनलाइन मनी गेम्सवर देशव्यापी बंदी लागू झाल्यानंतर वापरकर्त्यांचा मोठा आणि सातत्यपूर्ण कल ऑफशोर सट्टेबाजी प्लॅटफॉर्मकडे वळला आहे। सर्वेक्षणातील निष्कर्ष सूचित करतात की मनी-आधारित गेमिंग क्रियाकलाप पूर्णपणे थांबण्याऐवजी, या बंदीमुळे मोठ्या प्रमाणावर वापरकर्ते भारताच्या नियामक चौकटीबाहेर कार्यरत असलेल्या ऑफशोर प्लॅटफॉर्मकडे स्थलांतरित झाले आहेत.

## ग्रामीण जीवनांवर सकारात्मक प्रभाव साधला

**मुंबई:** भारतातील अग्रगण्य एनबीएफसींपैकी एक असलेल्या एसएमएफजी इंडिया क्रेडिटने १४ फेब्रुवारी २०२६ रोजी आपल्या प्रमुख पशुधन कल्याण आणि ग्रामीण उपजीविका उपक्रमाचा ८ वा पशु विकास दिन यशस्वीरीत्या पूर्ण केला. 'सर्वोत्तम सेवा: पशु, परिवार आणि प्रगती' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाने पशुधनाचे आरोग्य, कुटुंबाचे कल्याण आणि शाश्र्वत प्रगती यांना बळकटी देत सर्वांगीण ग्रामीण विकासाबाबत संस्थेची बांधिलकी अधिक दृढ केली.

## 'एजेंटिक एआय'ची सुरूवात

**छत्रपती संभाजीनगर :** सॅमसंगने आपला नवीन प्रमुख स्मार्टफोन गॅलेक्सी एस२६ अल्ट्रा लाँच केला आहे आणि स्मार्टफोनवरील नवीन प्रायव्हसी डिस्प्ले वैशिष्ट्याला तंत्रज्ञान क्षेत्रात वैश्र्विक आकर्षण मिळाले आहे.सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व सीईओ जेबी पर्क म्हणाले की, या उद्योगामधील पहिल्या वैशिष्ट्यासह स्मार्टफोन उद्योगासाठी गोपनीयतेचे नवीन युग सुरू झाले आहे.''आपण आता एआयच्या युगामध्ये असल्यामुळे गॅलेक्सीएस२६ सिरीजवरील प्रायव्हसी अपग्रेड करण्यात आली आहे. थर्ड-पार्टी फिल्टर्सच्या तुलनेत प्रायव्हसी डिस्प्ले प्रत्यक्ष डिस्प्लेमध्ये एकीकृत करण्यात आला आहे, ज्यामुळे दैनंदिन वापरादरम्यान अद्वितीय व्युइंग अनुभव मिळतो, तसेच इतरांना डिस्प्लेवर काहीच दिसत नाही. वापरकर्ते स्क्रिनवर विशिष्ट भागांसाठी गोपनीयता ठेवू शकतात किंवा स्क्रिन कार्यान्वित झाल्यानंतर कस्टमाइज करू शकतात, ज्यामधून विनासायास व सर्वोत्तम संरक्षणाची खात्री मिळते,'' असे ते म्हणाले.

# एमजीएममध्ये 'विकसित भारत युवा संसद' स्पर्धा यशस्वीपणे संपन्न

## विकसित भारत युवा संसद राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ५ विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. ०६ मार्च :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेयर्स अँड स्पोर्ट्स आणि मेरा युवा भारत छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या विकसित भारत युवा संसदेचे एमजीएम विद्यापीठात यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय स्पर्धेतील प्रथम ५ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवाल, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ.आर.आर.देशमुख व सर्व संबंधित मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.डॉ.ह.नि.सोनकांबळे, प्रा.डॉ.अमरदीप असोलकर, प्रा.डॉ. भागवत वाघ, प्रा. डॉ. राम गायकवाड आणि जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरूळे यांनी काम पाहिले. यावेळी प्रा.आशुतोष पाटील, सुनिल शिरसिकर, प्रकाश त्रिभुवन, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

देशाच्या भविष्यावर प्रभाव टाकणाऱ्या राष्ट्रीय प्रश्र्नांवर तरुणांना मते मांडण्याची संधी मिळावी आणि त्यांची नेतृत्व क्षमता विकसित व्हावी, यासाठी 'विकसित भारत युवा संसद २०२६' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १८ ते २५ वर्षे वयोगटातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या जिल्हास्तरीय स्पर्धेत एकूण ८४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. 'आणीबाणीचे ५० वर्षे : भारतीय लोकशाहीसाठी शिकवण' या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. गुणांकणासह प्रथम येणाऱ्या ५ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत : विठ्ठल निर्मळ, सांज घुगे, साहिल प्रभूदेसाई, अनघा गालफाडे,प्रथमेश चाटे



# 'उजास'देणार महिलांच्या नेतृत्वाखालील उपजीविकेच्या संधींना देणार बळकटी

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. ०६ मार्च :** महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर उजासने महाराष्ट्रातील महिलांच्या नेतृत्वाखालील उत्पादन नेटवर्कचा विस्तार करत वर्धा येथे नवीन ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिट सुरू केले. आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या अंतर्गत अद्वैतेशा बिर्ला यांनी स्थापन केलेल्या या उपक्रमाला महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानचे सहकार्य लाभले आहे. या विस्तारामुळे राज्यात आता दोन युनिट्स कार्यरत असून ४५ स्वयंसेवा गटांतील महिलांना थेट रोजगार उपलब्ध झाला आहे, तर विदर्भ व मराठवाड्यातील सुमारे १,५०० महिलांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण होत आहेत.



जालना येथील युनिटने दोन वर्षांत १,११,१२५ पुनर्वापरयोग्य कापडी पॅडचे उत्पादन करून वितरण जाळे संभाजीनगर, नांदेड, परभणी, बीड व बुलढाणा जिल्ह्यांपर्यंत विस्तारले आहे. 'मेन्स्ट्रुअल हेल्थ एक्सप्रेस' मोहिमेद्वारे २५ राज्ये व १२१ शहरांमध्ये मोफत पॅड वितरण व जागरूकता उपक्रम राबविण्यात आले. नव्या वर्धा युनिटमधून दरवर्षी ५५,००० हून अधिक पॅड उत्पादनाचा अंदाज असून सहभागी महिलांना सरासरी ७५,००० रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्नाची संधी उपलब्ध होते. हा मॉडेल आर्थिक सक्षमीकरणासोबत पर्यावरणपूरक आणि समुदाय-आधारित विकासाला गती देणारा ठरत आहे.

# एमजीएममध्ये 'चक्रव्यूह' एकांकिका पाहून रसिक हेलावले

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. ०६ मार्च :** अगं बायने, कितीबी तरास झाला..कितीबी हाल झाले, तरी म्या ह्यो खेळ नाय सोडणार! डोंबारी म्हणूनशानं जगनार आन डोंबारी म्हणूनशानच मरनार, ही आपली कला आहे.. आन कला जित्ती राहिली पाहिजे बग...! यासारख्या अनेक भावनिक संवादांनी उपस्थित रसिक अक्षरशः हेलावून गेले.. हे संवाद होते' या एकांकिका नाट्यातले! एमजीएम विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित चक्रव्यूह ही एकांकिका रुक्मिणी सभागृहात प्रभावीपणे सादर करण्यात आली.

सदर नाट्यात डोंबारी आणि त्यांची व्यथा लेखक उदय कातनेश्र्वरकर यांनी अतिशय तरल पद्धतीने मांडली आहे. यात त्यांनी डोंबारी समाजाच्या बोलीभाषेचा अतिशय चपखल वापर केलेला होता. त्यांच्या लेखनाला कलावंतांनी देखील तितक्यात समर्थपणे सादर करून उपस्थित रसिकांच्या डोळ्यात पाणी आणले.

महेश नलावडे दिग्दर्शित सदर प्रयोगात – गौरव देशमुख व यज्ञदा जोशी यांनी आपल्या भूमिका समरसून केल्या, तर श्र्लोक मंडळ या बालकलावंताने देखील जोरकस अभिनयाने



आपल्या कलागुणांची चुणूक दाखवून दिली.

प्रयोगास कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, अनुराधाताई कदम, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, एकांकिकेचे मार्गदर्शक विभागप्रमुख डॉ.राजू सोनवणे इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी वेदांत लोखंडे, बापू घडलिंगे, सतीश जोगदंड, प्रथमेश सैंदाणे ध्रुव कोरान्ने, प्रतीक आडे, देवश्री दाभाडकर,ऋचा बक्षी, समीक्षा सराफ, रेणुका राजपूत, अभिजीत मस्के, शशिकांत सोमासे, गौरव ढोले इत्यादींनी परिश्रम घेतले.

# बिडकीन येथे भव्य हिंदू संमेलन संपन्न; संत-महंतांचे मार्गदर्शन, संघटन व संस्कारांवर भर..

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०६ मार्च :** येथे आयोजित भव्य हिंदू संमेलन उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडले. संमेलनात संत-महंत व विविध मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना कुटुंबसंस्कार, समरसता, राष्ट्रभक्ती आणि समाज संघटन यावर विशेष भर दिला.हा कार्यक्रम दि.२८ रोजी सायंकाळी सात वाजता आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र ठाणगे व ज्ञानेश्र्वर औटी यांनी केले, तर संमेलनाध्यक्ष विजय शेजुळ यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. हिंदू समाजातील एकजूट, कुटुंबव्यवस्थेचे जतन आणि संस्कारांचे संवर्धन यासाठी अशा संमेलनांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.मुनीश्री सुदर्शन नागराजबाबा कपाटे यांनी आपल्या प्रवचनात आई-वडिलांचा सन्मान, कुटुंबातील मुलामुलींमध्ये योग्य संस्कार व विचारांची जपणूक यावर भर दिला. युवक-युवतींनी सोशल मीडियाच्या प्रभावापासून सजग राहून जीवनमूल्ये जपावीत, असे त्यांनी सांगितले. समाज संघटन वाढविणे आणि परस्पर सन्मान राखणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.ह.भ.प. गुरुवर्य कृष्णगिरीजी महाराज (श्री क्षेत्र अंबाऋषी संस्थान) यांनी समाजहिताच्या विविध उपक्रमांची गरज अधोरेखित करत आयोजन समितीचे अभिनंदन केले. राष्ट्रसेवा, धर्मसंरक्षण आणि पर्यावरण संवर्धन यावर त्यांनी मार्गदर्शन केले.इंद्रेश कुमारजी (अखिल भारतीय कार्यकारणी सदस्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) यांनी भारतमातेचा सन्मान, समरसता आणि सर्वधर्मीयांमध्ये परस्पर आदर राखण्याचे आवाहन केले. जात-पात, उच्च-नीच भेदभाव न करता प्रेमाने जगण्याचा संदेश त्यांनी दिला. नफरत नव्हे, प्रेमाने समाज घडवूया, असे ते म्हणाले.



पर्यावरण रक्षण आणि संस्कारित पिढी घडविण्याचे कार्य संघाच्या माध्यमातून सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.धर्माचार्य साध्वी ह.भ.प. दुर्गा दिदी (कर्मयोगीनी आश्रम, अलियाबाद) यांनी मातृशक्तीचे महत्त्व, इतिहासातील वीरांगनांचा आदर्श आणि कुटुंबसंस्कारांचे जतन यावर भाष्य केले. युवक-युवतींनी विवेकाने वागावे, समाजहिताचा विचार करावा, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या शेवटी संमेलनाध्यक्षांचा सर्व संतांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अनिलजी गायकवाड यांच्या 'पसायदान'ने कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन समितीचे सचिव रुषिकेश आगाज यांनी केले.यावेळी कार्यक्रमाचे गणेश काळे,संतोष मोदी, बबन काळे, शिवप्रसाद औटी, लहु कातबने,मनोज दौंडे,अरविंद शेजुळ, कुणाल पाटील, बाबासाहेब धर्मे, गणेश मिसाळ,गौरव कुलकर्णी,विष्णू चौधरी,विजय पडियाल, अविनाश जोशी,अशोक हिवाळे,रविंद्र गायकवाड,आप्पासाहेब ठाणगे, नवनाथ बांगर, सोमनाथ निनाळे, रविंद्र आगाज आदींसह

हिंदु संमेलन समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी यशस्वीतेसाठी मोठे परिश्रम घेतले.या संमेलनास ह.भ.प. गुरुवर्य कृष्णाजी महाराज नवले (श्री संत एकनाथ महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र पैठण) यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे समाप्तीनंतर भव्यदिव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अनुषंगाने महिला व बालक तसेच वयोवृद्ध आणि पुरूषांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.तसेच कार्यक्रम निमित्ताने बिडकीन सह परिसरातील समाजबांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## एमजीएममध्ये व्यसनमुक्तीवर जनजागृतीवर परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. ०६ मार्च :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बेसिक अँड अप्लाइड सायन्सेसच्या गणित व सांख्यिकी विभागाच्या वतीने 'कॉट इन द लूप : अंडरस्टँडिंग ॲडिक्शन इन द मॉडर्न एज' या विषयावर व्यसनमुक्ती जनजागृतीपर परिसंवादाचे आयोजन आर्यभट्ट सभागृहात करण्यात आले होते. या परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, सिव्हिल हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ.कार्तिक रमण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तंबाखूचे व्यसन,अमली पदार्थांचे सेवन, ऑनलाईन गेमिंग आणि सोशल मीडियावरील वाढते अवलंबित्व यांसारख्या आधुनिक काळातील व्यसनांच्या विविध पैलूंवर त्यांनी सविस्तर भाष्य केले. मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव,करिअर कट्टा उपक्रमामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातून प्रथम




**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. ०६ मार्च :** येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव यांना महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत दि.२५ फेब्रुवारी २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर,मुंबई येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा स्पर्धेच्या २०२५-२६ या विभागीय निकालामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातून प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले.त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांना विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी रवींद्र माठे (खादी व ग्रामोद्योग सभापती) तसेच यशवंत शितोळे यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरित करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा विभागाच्या वतीने युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रभर विविध महाविद्यालयांत करिअर कट्टा हा उपक्रम राबविला जातो. त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ नाना काळे,सचिव प्रकाश दादा काळे,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,महाविद्यालयीन समन्वयक डॉ.मनोजकुमार चोपडे, डॉ.संतोष पडघन यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तसेच विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## तरुण खन्ना करणार गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदणीकरिता अर्ज

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. ०६ मार्च :** एण्ड टीव्हीवरील आगामी डिव्हाइन ड्रॅमेडी 'हे भगवान – कितना बदल गया इन्सान!' या मालिकेबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. या मालिकेत महादेवांची भूमिका साकारणारे अभिनेता तरुण खन्ना यांनी विविध दूरदर्शन मालिकांमध्ये आतापर्यंत १७ वेळा भगवान शिवांची भूमिका साकारली आहे. या अनोख्या कामगिरीची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये करण्यासाठी ते अर्ज करण्याच्या तयारीत आहेत. महादेवांची भूमिका साकारणे हा केवळ अभिनय नसून आध्यात्मिक अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले. प्रेक्षकांचे प्रेम आणि निर्मात्यांचा विश्र्वास हीच मोठी प्रेरणा असल्याचेही त्यांनी नमूद केले. ही मालिका १६ मार्चपासून सोमवार ते शुक्रवार रात्री ९.३० वाजता एण्ड टीव्हीवर प्रसारित होणार आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क्र. ३९०/२०२५

अर्जदार :- १) प्रेमसिंग पि. शिवसींग महेर (राजपुत), २) भगवान पि. शिवसींग महेर (राजपुत) ३) रामधन पि. शिवसींग महेर (राजपुत) ४)लक्ष्मण पि. शिवसींग महेर (राजपुत) ५) महादु पि. शिवसींग महेर (राजपुत) ६) राजकुवर भ्र. शिवसींग महेर (राजपुत). ७)रामकुवर भ्र. प्रताप ढाकरे (राजपुत), ८)शामलाल पि. राजाराम महेर (राजपुत) (मयत), ८-ए. राजाबाई भ्र. शामलाल महेर (राजपुत), ८-बी. शंकर पि. शामलाल महेर (राजपुत), ८-सी. लखन पि. शामलाल महेर (राजपुत), ८-डी. शांताबाई भ्र. उदयसिंग डोभाळ, ८-इ. अनिता भ्र. लक्ष्मण ताटु, ४-एफ. मंगलबाई भ्र. रविंद्र चापले, ९. मिराबाई भ्र. अंबरसिंग महेर (राजपुत), १०) विठठलसिंग पि. अंबरसिंग महेर (राजपुत), ११) कपुरचंद पि. अंबरसिंग महेर (राजपुत), १२)देवकाबाई भ्र. गणेश घुनावत, रा. अर्जदार क. १ ते ६, ८-अ ते ८-क, व ९ ते ११ हे सर्व रा. कोबापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर अर्जदार क. ७ रा. वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर, अर्जदार क. १२ रा. वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ड. बी.आर. राजपुत यांचे मार्फत अर्ज दिला की, मानसिंग पि. राजाराम महेर (राजपुत) हे दिनांक ०५/०८/२०१४ रोजी मयत झाले असुन ते अविवाहीत होते त्यांचे आई वडील हे फार पुर्वी मयत झालेले आहेत. मानसिंग यास तिन भाउ नामे शिवसींग, शामलाल व अंबरसिंग असे आहेत त्यापैकी शिवसिंग व अंबरसिंग हे सुध्दा मयत झाले असुन अर्जदार क. १ ते ७ हे मयत शिवसिंग यांचे तर अर्जदार क. ९ ते १२ हे मयत अंबरसिंग यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार क. ८ शामलाल हे मयत मानसिंग यांचे सख्ये भाउ होते ते सदर प्रकरण दाखल केल्यानंतर दिनांक २४/१२/२०२५ रोजी मयत झाले असुन अर्जदार क. ८ -ए ते ८-एफ हे त्यांचे वारस आहेत. सर्व अर्जदार क. १ ते १२ मयत मानसिंग पि. राजाराम महेर (राजपुत) यांचे कायदेशिर वारस असुन त्यांना शासकिय कामाकरीता मानसिंग याचे वारस असल्याबाबतचे हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशीप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माइया सही व शिक्याने आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी दिले.

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**